विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१२ |
| वर्ष | : | सत्तेचाळिसावे |
| अंक | : | तिसरा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१२**
**गणपत्रिका क्रमांक : १७३**

Registered with the
Registrar of News-
paper for India,
under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष सत्तेचाळिसावे अंक तिसरा भाद्रपद/अश्विन शके १९३४, ऑक्टोबर २०१२

## संपादकीय

### स्वातंत्र्य फक्त!

असीम त्रिवेदी यांच्या व्यंगचित्रामुळे 'स्वातंत्र्याचा' मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

'स्वातंत्र्य' आणि 'स्वैराचार' यांमधील फरकाची रेषा अत्यंत अस्पष्ट आणि नाजूक आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे या संकल्पना प्रत्यक्ष जीवनातील संदर्भांशी निगडित आहेत. शब्दकोशातील अर्थापुरत्या त्या सीमित करता येत नाहीत. या संकल्पनांचे 'संदर्भ' हे सुद्धा आपल्या सामाजिक संस्था, संस्कृतीचे सातत्य व संस्कारांवर अवलंबून आहेत. 'स्वातंत्र्य' ही संकल्पना जेव्हा 'पारतंत्र्य' या शब्दाशी निगडित होते तेव्हा त्याचा संदर्भ 'गुलागिरीतून मुक्तता' असाच होतो. पण हाच शब्द जेव्हा 'व्यक्ति'स्वातंत्र्य होतो तेव्हा मात्र त्याला अनेक सांस्कृतिक संदर्भांना छेदून जावे लागते. 'नीती' आणि 'अनीती' ही अशीच एक एकमेकात गुंतलेली संकल्पना आहे. त्यांच्या सीमारेषाही अस्पष्ट असून त्या जीवनातील संदर्भांशीच निगडित आहेत. 'स्वातंत्र्य' ही संकल्पना जेव्हा या संकल्पनांना छेदते तेव्हा तर मोठा गोंधळच होतो.

यातच आजकाल भर पडली आहे ती 'अधिकारांची'. म्हणूनच राजकारण आणि समाजकारणामध्ये 'स्वातंत्र्य' 'नीती अनीती' व 'अधिकार' या सर्वांची 'तार्किक' बांधणी आपला मुद्दा पटवताना विद्वान करत असतात. बहुतेक वेळेला तो वकिली युक्तीवादच असतो. असीम त्रिवेदी यांच्या व्यंगचित्रावर आक्षेप घेणारे, फिदा हुसेन यांच्या चित्रांच्याबाबतीत मात्र 'स्वातंत्र्य हळवे' होतात; तर त्रिवेदी यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे समर्थन करणारांची वाचा सलमान रश्दी किंवा तस्लीमा नसरीन यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संदर्भात लुळी पडते. आजच्या 'स्वातंत्र्य' या संकल्पनेच्याबाबतीत असल्याच भोंदू वैद्यांचा गलबला अधिक आहे. यांचा 'स्वातंत्र्य' 'नीती अनीती' आणि 'अधिकार' या संकल्पना त्यांच्या राजकीय किंवा सामाजिक सिद्धांतांना बांधलेल्या आहेत. अनेक विचारवंतांचा, स्वातंत्र्य व अधिकार यांचा पुरस्कार हा आपण पुढारलेले व प्रगतिशील आहोत हे दाखविण्याच्या

(पृष्ठ क्र. ३१ वर)

**इकडे लक्ष द्यावे –**

**<u>१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सभासद, वर्षात केव्हाही होता येते.</u>**

२) आजीव सभासद योजना बंद करण्यात आली आहे. जे सभासद ३१ मार्च २००९ पर्यंत 'आजीव' झाले आहेत. त्यांना अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. <u>त्यांनी एप्रिल २००९ पासून वाढवलेली देणगी विचारात घेऊन योग्य ती ऐच्छिक देणगी पाठवावी परदेशस्थ सभासदांनी ७५ $ देणगी पाठवावी, अशी विनंती आहे.</u>

३) देणगी, मनीऑर्डर, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डी.डी.) **'सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट'** या नावाने खालील **पत्त्यावरच** पाठवावी.

**सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,**
द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय,
प्रताप सिनेमासमोर, कोलबाड,
ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१
कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते १ व सायं. ४ ते ७.

ट्रस्टचे बँक खाते ठाणे जनता सहकारी बँक लि. ठाणे भारत सहकारी बँक व भारतीय स्टेट बँक या बँकांमध्ये आहे. मुंबई व ठाणे बाहेरील सभासदांनी वरील बँकां व्यतिरिक्त बँकांवरील धनादेश पाठविल्यास वटणावळ ५० रु. अधिक पाठवावे.

देणगी पाठविताना संपूर्ण नाव, पत्ता व सभासद क्रमांक (सभासद असल्यास) ही माहिती सुवाच्य अक्षरात कळवावी.

**<u>४) खालील ठिकाणी फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी मनीऑर्डर/धनादेश पाठवू नये.</u>**

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**
कापडाचे व्यापारी,
१४८, प्रार्थना समाज, गिरगांव,
मुंबई – ४०० ००४.
दूरध्वनी : २३८८ ०६४५

**रविवारी बंद**

सद्धर्म अंकासंबंधी माहितीकरता यांच्याशी संपर्क साधावा.

ब) **श्री. प्रकाश भा. दीक्षित**
३०२, दुर्गा सोसायटी,
कोलबाड, ठाणे ४०० ६०१.
दूरध्वनी : २५४७२००५
दूरभाष : ९८१९६९३१९५

**<u>५) पत्ता बदलला असल्यास ताबडतोब कळवावे.</u>**

६) पाकिटावर सभासद क्रमांकासमोर छापलेल्या त्रोटक अक्षरांचा खुलासा.

१) वा. दे. – वार्षिक देणगीदार सभासद

२) आ. – आजीव सभासद

३) दी. का. – दीर्घकालीन सभासद

४) का.भे. – कायम भेट

<u>'वा. दे.' व 'दी. का.' या अक्षरांसमोर देणगी कधी संपेल ते वर्ष दाखविले आहे.</u>

– संपादक

या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या त्रैमासिकातील मजकूर संपादकांच्या परवानगीशिवाय कोणीही कुठेही छापू नये.
लेखकांनी या अंकातील त्यांचा लेख इतर ठिकाणी पाठविणे असल्यास, तो सद्धर्माच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे असा उल्लेख करावा.
– संपादक

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संध्येतील २४ नावे-व्युत्पत्ती व समानार्थी नामे | ४ |
| वादो नावलंम्ब्य | ५ |
| गीत कृष्णायन | ७ |
| श्री गोंदवलेकर महाराजांनी निरनिराळ्या प्रसंगी भक्तांना उपदेश करताना व्यक्त केलेले मार्मिक स्फूट विचार - १ | ९ |
| अक्षौहिणी सैन्य म्हणजे किती ? | १० |
| तत्व विचार | १२ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी मराठी म्हणी वाक्यप्रचार लेख १३ वा | १९ |
| पुनर्जन्म प्रमेय आणि प्रमाण (उत्तरार्ध) | २१ |
| अध्याय ८ : अक्षर ब्रह्म योग | २८ |
| अध्याय ९ : राजविद्या राजगुह्य योग | २९ |


**जुलै २०१२ ते सप्टेंबर २०१२ पर्यंत दीर्घकालीन सभासदासाठी व ऐच्छिक देणगी देणाऱ्यांची नावे**

**दीर्घकालीन सभासदासाठी**

१) ओंकार प्रशांत दिवाडकर

वरील सर्व सभासदांचे आम्ही आभारी आहोत.

- संपादक

**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | | |
|---|---|---|
| १) | सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) | श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) | हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) | श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) | कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) | तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) | पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) | कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) (पृष्ठसंख्या ९६) | रु.१५ |
| ९) | सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) | उपासना | रु. ४० |
| ११) | श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) | चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) | गंगालहरी | रु. २५ |
| १४) | गणपत्यथर्वशीर्षातील व्याकरण | रु. ३० |
| १५) | सांख्यदर्शन | रु. ५० |

**जुने सद्धर्म अंक मिळतील**

सद्धर्मचा पहिला अंक ऑगस्ट १९६५ ला प्रसिद्ध झाला. हा अंक व त्यानंतर ऑक्टोबर १९६५ पासून जानेवारी २०११ पर्यंतचे (एप्रिल १९७४ व जुलै १९७४ चे अंक सोडून) सर्व अंक 'www.Granthalaya.org' या संकेत-स्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुकाना ते download करून मिळू शकतील व त्यांची प्रतही तयार करून घेता येईल, याची नोंद घ्यावी.

एप्रिल १९७४ व जुलै १९७४ चे अंक काही अडचणीमुळे प्रसिद्ध झाले नाहीत.

**१) केशव :** हे नाम अमरकोषात दोन ठिकाणी उल्लेखलेले आहे.

१) क्रमाङ्क ३६ २) क्रमाङ्क ११६४ (निर्णयसागर प्रत)

१)३६- प्रशस्ताः केशाः सन्ति अस्य इति। तध्दित वृत्ती अर्थ - ज्याचे केस भव्य आहेत असा

समानार्थी - अमरकोषात विष्णुची जी ३९ नावे दिली आहेत त्यापैकी 'केशवः' हे एक आहे.

२) ११६४- व्युत्पत्ती वरील प्रमाणेच आहे व अर्थही तोच आहे. पण हे नाम मनुष्यवर्गात दिले आहे व वरचे स्वर्गवर्गात
समानार्थी- केशिकः, केशी, वलिनः, केशवान्.

**२) नारायणः –** १) नारा म्हणजे पाणी व अयन म्हणजे निवासस्थान आपो नारा इति प्रोक्ता, आपो वै नरसूनवः। ता यदस्यायनं पूर्वं तेन नारायणः स्मृतः (मनस्मृती १-१०)

२) नराणां समूहो नारम्, तदयनं यस्य सः बहुव्रीहि समास (अनेकमन्य पदार्थे। अष्टाध्यायी अध्याय २, पाद २, सूत्र २४ ह्या सूत्राने समास झाला) चातुर्मासात विष्णू पाण्यावर झोपतो अशी कल्पना रूढ आहे.
अमरकोषात विष्णूची जी ३९ नावे दिली आहेत. त्यापैकी एक नारायण.

**३) माधवः –** १) मा म्हणजे लक्ष्मी व धन म्हणजे नवरा. मायाः धवः षष्ठी तत्पुरुष समास.

२) माधव म्हणजे वैशाख महिना इतर दोन नामे वैशाखः, राधः . एकूण ३ नामे.

३) मधु पुष्परसोऽ स्मिन्नस्तीति माधवः।

४) विष्णूच्या ३९ नावांपैकी एक माधव.

**४) गोविन्दः** १) गां विन्दति सः इति वा गोविन्दः उपपद तत्पुरुष गाईला जाणतो तो. विष्णूच्या ३९ नावापैकी एक.

२) गोष्ठाध्यक्ष - गोठ्यांची व्यवस्था राखणारा किंवा गोशाळेचा मालक.

३) इतर अर्थ - बृहस्पति, विष्णु.

**५) विष्णुः–** वेवेष्टि, व्याप्नोति इति। सर्व विश्वाला व्यापणारा.

**६) मधुसूदनः–** मधु नावाचा राक्षस, सूद् १ आत्मनेपद ठार मारणे. मधु नावाच्या राक्षसाला ज्याने ठार मारले तो कृष्ण असा बहुव्रीहि समास आहे. मधु रिपु, मध्वरि इत्यादी. मधुरिपु विष्णूच्या ३९ नावापैकी एक - मधोः दैत्यस्य रिपुः षष्ठी तत्पुरुष

**७) त्रिविक्रमः–** त्रिषु लोकेषु विक्रमाः पादन्यासः यस्य बहुव्रीहि समास (स्वर्ग मृत्यू पाताळ ह्या तिन्ही लोकात पराक्रम. विष्णुच ३९ नावापैकी एक.)

**श्री. दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३ विठ्ठल मंदिराजवळ,
मु. पो. मुद्रेखुर्द, ता. कर्जत
जि. रायगड ४१० २०१.
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

## वादो नावलंम्ब्यः-

**ज. गो. मराठे**

वादः न अवलम्ब्यः. म्हणजे वादाचे अवलंबन करुं नये. जगद्गुरु आद्य शंकराचार्यांनी जो उपदेश केला त्यांतील हे एक वाक्य. या वाकयाचा साधा सरळ मराठी अर्थ असा की वाद घालू नये. तसे पाहिले तर वाद हा शब्दच मुळी वद म्हणजे बोलणे या धातूवरुन बनला. म्हणजे बोलणारा माणूस कधीतरी वाद घालणार. भांडण करणार जो पर्यंत मतभिन्नता रहाणार तो पर्यंत तोंड बंद होणार नाही. वादावादी तंटा बखेडा, कोर्टकचेऱ्या सगळे चालूच रहाणार. स्वतः जगद्गुरु शंकराचार्यांनी वाद करुनच आपले अव्दैतमत प्रस्थापिले आहे. त्यांचा मंडनमिश्राशी सरस्वतीच्या साक्षीने झालेला वाद प्रसिद्ध आहे. वाद कसा असावा त्याचा तो उत्तम नमुना आहे. त्या केवळ एका वादानेच जगद्गुरु आदि शंकराचार्यांनी वैदिक धर्माची पुनःस्थापना केली. ज्याला 'दिग्विजय' म्हणतात. तो या एका वादांतच असताना स्वतः आचार्यच वादाचा निषेध कां करतात? या प्रश्नाची अनेक उत्तरे अनेक जण देतील आणि तोच एक वादविषय होईल म्हणून संत या विषयी काय म्हणतात ते पाहू.

ऋषी, आचार्य, गुरु, मातापिता या सगळ्यांपेक्षां संत हे जास्त मान्यता पावलेले दिसतात. संतवचनी अविश्वासे ऐसा कोण पतित असे? या समर्थांच्या प्रश्नांतच त्याचे पतीत हे उत्तर आहे. आपणाला संतांत वाद दिसत नाहीत. संतांचे भक्त आपल्या संतांचं मोठेपण सांगण्यासाठी धडपडतात. वेळी वाद घालतात. अगदी लढाया सुध्दा करतात.जगांतील सगळ्या लढाया देव व धर्म यांच्या आधारानेच झालेल्या दिसतात.

संत श्रेष्ठः तुकाराम महाराज व समर्थ तसे समकालीन संत त्यांच्या काळांतच छत्रपती शिवराय अवतरले. त्यांनी या दोघांच्या भेटी घेतल्या. सर्वांचा सत्कार केला. स्वतः तुकाराम व रामदास यांनी कुठे वाद केला असा उल्लेख नाही. हे तिघेही आपापले काम करीत होते. जो काही थोडा धर्म उरला तो या तिघांमुळे असे दिसते. स्वतः भागवत धर्माचा पाया रचणाऱ्या श्री संत ज्ञानेश्वरानी सुद्धा कुठे वाद केला नाही. थोडे निःपक्षपाती दृष्टीने पहाल तर असे दिसेल की या सगळ्या संतानी भाष्यकारांने वाट पुसत म्हणजे भाष्यकार शंकराचार्यांनाच नीट विचारुन वाटचाल केली. मानव हितासाठी त्यांना जो मार्ग स्पष्ट दिसला तो ते दुसऱ्यांना दाखवीत चालले. त्यांतले नामदेव सोडले तर बहुतेक संत कमी व यांतच आपले काम करुन गेले. आज यांना जाऊन शेकडो वर्षे झाली तरी लोक त्यांच्याच मार्गाने जातात व सुख मिळवतात. त्यांच्या वचनात विसंगती दिसत नाही.

संत श्रेष्ठ अतिवादी नव्हे शुद्ध या बीजाचा। जाणावा जातीचा अधम तो। असा त्याच्या जातीचाच उल्लेख करतात! ते स्वतःच सांगतात वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा इतरांनी वहावा भार माथा। इथे तर अर्थ न कळता केवळ अक्षरे जपणाऱ्यांना सरळ सरळ 'माथाडी' म्हणतात. कारण आपण कोण आहो?' कशासाठी

आलो आहो? कुठे जायचे आहे? हे त्यांना स्पष्ट कळले होते. तो ज्ञानाचा कळस होता ते स्पष्ट सांगतात. आम्ही वैकुंठाचे वासी। आलों याची कारणासी। बोलिले जे ऋषी साच भावे वर्ताया।

ते तसा वर्ताव करुन आम्ही जातो अमुच्या गावा असे सांगून गेले. त्यांच्या मागे आपण वारकरी धारकरी असले वाद करीत आलो. मामा दांडेकर हे सगळ्यांनाच वंद्य आहेत ते अधिक थोडे जगते तर त्यांनी वारकरी व धारकरी हा वाद मिटवला असता. पण ते झाले नाही.

समर्थ रामदास स्वामींनी आपल्या मनाच्या श्लोकांत संवादावर भर दिला. तुटे वाद संवाद तो हितकारी जिथें वाद तुटतो व संवाद सुरु होतो तो वाद बोलणे हितकारी अशी वादाची सुंदर व्याख्या केली.

पूर्ण ज्ञानात वाद नाही. पूर्ण अज्ञानात वाद नाही मग वाद होतो कुठे तर अर्धवटांत. सत्वगुणांत-संवाद आहे. तमो गुणी दगड बोल नाही. तो जड आहे मग झगडा कुठे आहे रजोगुणांत. रेजोगुण म्हणजे राजकारणे सत्ताकरण ह्या रजोगुणांत युद्ध वादस्पर्धा ही अनिवार्य आहे. थोडकयांत अर्धवटांतच डोके फोडण्याचे वाद होतात तसा वाद आचार्यांना नको आहे. वादासाठी सत्याचा आग्रह धरणारी पण निराग्रही व्यक्ती असावी. ती अहंकारमुक्त असावी म्हणून वाद ऐवजी ज्ञान्याच्या ज्ञानावर श्रद्धा ठेऊन चांगले वागणे हेच आचार्यांनी वरील वचनात अभिप्रेत आहे.

थोडक्यात द्वैत असतो वाद रहाणारच पण पूर्ण अद्वैतांत वाद नाही ते ब्रह्मतत्त्व निर्विवाद आहे असेच त्यांना सांगायचे आहे.

**श्री. ज. गो. मराठे**
३०४, ॐ रिद्धी सिद्धी अपार्टमेन्ट,
पद्मणनगर, आगाशी-४०१३०१
दूरध्वनी : २५०-२५८८६९५

●●●

## कुबेरसुद्धा भिकेला लागेल...

**क्षिप्रमायमनालोक्य व्ययानश्च स्ववांछ्या।**
**परिक्षीयत एवासी धनी वैश्रवणोपमः ।।**

त्वरित (ताबडतोब) आणि सतत प्राप्त होणारी धनधान्यादि संपत्ति यांचा विचार न करता जो लहरीनुसार संपत्तीचा खर्च करीत असतो तो कुबेरासारखा संपन्न असला तरी त्याचें वैभव हां हां म्हणता नष्ट होईल.

कुबेर असला तरी भिकेला लागेल. तुरुत दान महापुण्य अशी एक अर्थवाही म्हण आहे. दानधर्म करावा असें मनांत आले की हातीं असलेल्या धनाचें दान करावें. त्यांत महापुण्य आहे. तुरुत म्हणजे त्वरित, लगेच. हातीं असलेलें धनच त्वरित दान करूं शकतो, त्याप्रमाणेंच निश्चित आणि नियमित हातीं येणारें धन लक्षांत घेऊन खर्च करावा, तोसुद्धां आपल्या लहरीनुसार नव्हे, सर्व दृष्टीनीं विचार करुन आकस्मिक अडचणींचाही विचार करुन खर्च करावा. खर्चाला मर्यादा हवी. अमर्यादा म्हणजे भिकेचे डोहाळे.

**'आनंदी आनंद'. (जाती पतितपावन)**
**गोकुळामधे पसरे वार्ता कृष्ण जन्मल्याची**
**आनंदाने पुलकित होई नगरी नंदाची ॥ धृ ॥**

**माय यशोदे न कळे बाळा ठेवावे कोठे**
**नंदहि लुटवी सर्व गोकुळी गोडाचे साठे**
**नमिती ईशा कृपे दिले वरदानच हे मोठे**
**मंगल वादये सुरात देती टाळी टिपरीची ॥ १ ॥**

**बल्लव सारे जमुनी नंदा आलिंगन देती**
**गोपस्त्रियांचे डोळे कृष्णा देखोनी निवती**
**मुले वासरे पिउनी वारा पळती बागडती**
**सर्वांच्या हृदयास येतसे भरती प्रेमाची ॥ २ ॥**

**खळखळ मंजुळ नाद करोनी वाहतसे यमुना**
**पक्षी सुमधुर गाणी गाती भरारती गगना**
**शीतल वारा घाली पिंगा विश्वात्म्या नमना**
**धन्य होतसे कृष्णा घेता कूस यशोदेची ॥ ३ ॥**

''दुष्टा, तुझा सर्वनाश करण्यासाठी पृथ्वीतलावर अवतरलेला देवकीचा आठवा पुत्र अगदी सुरक्षीत आहे. योग्य वेळ येताच तो तुझा वध केल्याखेरीज रहाणार नाही.''

कंसाच्या हातून निसटून विजेच्या लोळाप्रमाणे आकाशात लुप्त होताना यशोदाकन्येनं केलेली ती आकाशवाणी ऐकताच कंस भितीने गर्भगळीत होऊन जागच्या जागीच मटकन खाली बसला.

इकडे गोकुळात तांबडं फुटायच्या आधीच ते लबाड बाळ माता यशोदेच्या कुशीत शिरून रडू लागलं. त्या रडण्यानं यशोदा, नंद आदी सारेच सावध झाले. ज्या क्षणी त्या विश्वमोहन रुपड्याला त्यांनी पाहिलं त्या क्षणी त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

नंदाच्या दासी वाडयाबाहेर पडून गोकुळच्या रस्त्यांवरून हर्षातिशयानं धावत, ओरडत सुटल्या, 'पुत्र झाला हो! सखी यशोदेला आणि नंद महाराजांना मुलगा झाला हो! उठा! जागे व्हा!'

त्यांच्या आवाजानं अर्धवट झोपेत असलेलं गोकुळ खडबडून जागं झालं. नंद आणि यशोदा त्या गोपांची अतिशय लाडकी व्यक्तिमत्वं होती. त्यांच्या नेतृत्वाखाली गोपांचे दिवस मोठया समाधानानं व्यतीत होत होते. गोकुळाचं लालन, पालन, संरक्षण आणि संवर्धन उभयतां मातापितरांच्या ममतेनं करत होते. अशा त्या सुस्वभावी जोडप्याच्या घरी कित्येक वर्षे पाळणा हलू नये हा दैवाचा केवढा दुर्विलास होता.

म्हणूनच यशोदेला दिवस गेल्यापासून गोकुळातले आबालवृद्ध सर्वच या क्षणाची, या बातमीची कानांत प्राण आणून प्रतिक्षा करत होते. आणि अखेरीस तो सोनेरी भाग्य क्षण आला होता!

ती बातमी ऐकताच आनंदानं बेभान झालेले गोकुळवासी नंदाच्या वाडयाकडे धाव घेऊ लागले. माता आपल्या बालकांना विसरल्या, गोप आपल्या भार्यांना आणि वृद्ध मातापित्यांना विसरले, वासरं पान्हावलेल्या गाईचं दुध प्राशन

करायला विसरली! केव्हा एकदा त्या छकुल्याला डोळेभरून पाहू, केव्हा एकदा नंद महाराजांना गळामिठी घालून त्यांचं अभिनंदन करू, केव्हा एकदा प्रभूच्या मूर्तीला आनंदाश्रूंनी स्नान घालू असं सर्वानाच झालं होतं.

आता पाऊसही पूर्ण थांबला होता. त्या बाळाच्या दर्शनाच्या आतुरतेनं सारे बांध उल्लंघून धावणारी यमुना त्याच्या अंगुलीस्पर्शानं शांत झाली होती. आकाश निरभ्र झालं होतं आणि पूर्व दिशेला होऊ घातलेल्या अरुणोदयाची सुचिन्हं गगनमंडपी जाणवू लागली होती...

•••

**जबाबदारी प्रजेवरच....**

न सा सभा यत्र न सन्ति वृद्धाः ।
वृद्धा न ते ये न वदन्ति धर्मम् ।।
धर्मो न वै यत्रच नास्ति सत्यम् ।
सत्यं न तद्यच्छलनानुविद्धम् ।।
शौनकीय नीतिसार ११५

ज्या सभेंत ज्ञानी आणि अनुभवसंपन्न वृद्ध जन नसतात ती सभा नव्हे. जे समाजाचें धारणपोषण करणाऱ्या धर्माला अनुसरुन बोलत नाहींत ते 'वृद्ध' नव्हत. तो धर्म नव्हे कीं जो सत्यावर आधारलेला नसतो, आणि तें सत्य नव्हे कीं जें छल, कपट, राग, लोभ व द्वेष इत्यादि विकारांनी परिवेष्टित असतं.

प्राचीन काळी ग्रामसभा, विद्वत्सभा, धर्मसभा, राजसभा यांच्या द्वारा समाजाचं सर्वांगीण नियमन आणि मार्गदर्शन केलं जात असे. वैयक्तिक आणि सामाजिक अडीअडचणी तंटे-बखेडे यांचे निवारण या सभांद्वाराच केलें जात असे. त्या काळी राजशासनाची पाळेमुळे आजच्या शासनाइतकीं समाजांत वा वैयक्तिक जीवनांत खोलवर गेली नव्हतीं. बरीचशी प्रजा 'स्वयंशासित' होती. आणि तें स्वयंशासन 'प्रायः' रुढींच्यावर आधारलेलें असे. त्यामुळे तंटे-बखेडे फारसे होत नसत. परंपरागत आचार विचारांनी आपलें बव्हंशीं स्वायत्त जीवन जगणारी व्यक्ति आजच्या इतकी पराधीन-शासनाधीन नव्हती. आणि तत्कालीन विचारवन्तांचं-शास्त्रकारांचं धोरणही व्यक्तीला आणि समाजाला जास्तींतजास्त स्वाधीन आणि स्वयंपूर्ण करणे हेंच होतं. त्यामुळें व्यक्तींचं आणि समाजाचं मार्गदर्शन आणि नियमन करणाऱ्या-'सभेचं' स्वरुप ठरवितांनाप्राचीन शास्त्रकारांनीं किती काळजी घेतली आहे तें आरंभी दिलेल्या श्लोकावरुन दिसून येतें.

त्या नियामक सभेचे सदस्य ज्ञानानें आणि अनुभवानें समृद्ध असे वृद्ध असावे. ते वृद्ध धर्माला-(तत्कालीन सर्वमान्य रुढिआचार-विचार आणि नीतिमूल्यें) अनुसरुन बोलणारे असावेत, (त्यांची 'बांधिलकी' शाश्वत मूल्यांशी असावी, वैयक्तिक नफा नुकसानीशीं नसावी) आणि निर्णयाला आधारभूत म्हणून ज्या सत्याचा-वास्तवाचा आधार घ्यावयाचा तें 'सत्य' छलकपटरहित आणि विकार रहित बुद्धिनें स्वीकारलेलें असलें पाहिजे.

ज्ञानी, अनुभवी, मानवी जीवनांतील शाश्वतमूल्यांची जाण असलेले, आणि निर्विकार बुद्धीनें सत्याचा शोध घेणारे असे वृद्ध ज्या सभेंत असतात तिलाच सभा म्हणावें, आणि तीच सभा

(पृष्ठ क्र. २७ वर)

## श्री गोंदवलेकर महाराजांनी निरनिराळ्या प्रसंगी भक्तांना उपदेश करताना व्यक्त केलेले मार्मिक स्फूट विचार - १

विषय भोगांपासून मिळणारे सुख हे अल्पजिवी तात्पूरतेच असते. विषयभोगांपासून उत्पन्न होणा-या उपाधी मात्र माणसाला दु:ख देत रेंगाळत रहातात. म्हणून जाणता मनुष्य, ज्याला उपाधी नाहीत अशा शुद्ध आनंदाच्या शोधात असतो. असा तो शुद्ध परमानंद जो आत्मरुपांतच वसत असतो तो अनुभवण्यासाठी मात्र माणसाला साधनेचे कष्ट उपसावे लागतात. परंतु साधना सफल होऊन अंतरातील इश्वराची भेट झाली आणि परमानंदाचा अनुभव आला की साधकभक्त, प्रसूत होऊन नवजात बाळ पाहिल्यानंतर ज्याप्रमाणे स्त्री प्रसूतीवेदना आणि गर्भारपणाचे कष्ट विसरून जाते, त्याप्रमाणे कठोर साधनेचे कष्ट विसरून जातो. इतकेच काय तो आपले देहभानसुद्धा हरवून बसतो.वरील विचार सात अनुष्टूप छंदात बद्ध झाले ते असे. :-

विषयी-भोग देती तो आनंद तोचि नश्वर ।
उपाधी असती त्यासी, देती ज्या अंति देती दुख:च ।।१ ।।

इच्छिते व्यक्ति प्रत्येक , शुद्ध आनंद जो चिर ।
नसतीच उपाधी ज्या, जो ना हो अंती दुख:द ।।२ ।।

असा हा परमानंद भगवतरुपीच तो असे ।
भगवत रुपची ते दिव्य, आत्मरुपीच ते वसे ।।३ ।।

मिळण्या परमानंद आत्मरुपीच जो वसे ।
तपचर्याची लागे त्या, साधना कष्टही तसे ।।४।।

बाळंत विसरी जैसे स्त्री त्या प्रसूती वेदना।
कष्टही गर्भभारचे बाळाचे मुख पाहता ।।५।।

तैसेची साधना कष्ट विसरे भक्त त्या क्षणी ।
भेटता परमानंद विसरे ता निजासही ।। ६।।

भेटता अंतरी ईशस्वरूपानेद जो पुरा ।
समाधान मिळे जेची परमानंद तो खरा ।।७।।

**श्री. प्र.सि. मराठे**
४०२ सन फ्लॉवर, ठक्कर पार्क
वाकोला सांताक्रूज, (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी- २६६७२२०५

•••

### श्री. प्र. सि. मराठे, यांना पत्नीशोक

कळविण्यास अत्यंत दुख: होते कीं आपल्या सद्धर्मचे नियमित, जेष्ठ लेखक श्री. प्र. सि. मराठे यांच्या पत्नी सौ. सुनिता मराठे यांना **दिनांक २३, ऑगस्ट २०१२**, रोजी सकाळी देवाज्ञा झाली. सद्धर्माच्या सर्व वाचकांच्यावतीने, सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट- सद्धर्म प्रकाशनचे सर्व विश्वस्त श्री. मराठे यांच्या दु:खात सहभागी आहोत. ईश्वर मृतात्म्यास सुखशांती देवो व श्री मराठे व इतर सर्व कुटुंबियांना हे दु:ख सहन करण्याची शक्ति देवो अशी ईश्वर चरणी आम्हा सर्वाची प्रार्थना. आम्हा सर्वांतर्फे मृतात्म्यास ही विनम्र श्रद्धांजली.

**-संपादक व कार्यकारी विश्वस्त**

श्री. मराठे यांनी लेखनांत खंड पडू नये म्हणून, गोंदवलेकर महाराजांचे स्फूट विचार अनुष्टुप छंदात बद्ध करून पाठविलेले आहेत ते छापीत आहोत. तसेच या अंकासोबत श्री. प्र. सि. मराठेयांनी श्रीगणपती अथर्वशीर्ष भावार्थ (मराठीत अनुष्टुपात भाषांतरासहित) केलेल्या पुस्तकाची प्रत त्यांच्यातर्फे वाचकास भेट म्हणून पाठवित आहोत.

## अक्षौहिणी सैन्य म्हणजे किती?

वा. प. पटवर्धन

महाभारतीय युद्धांत एकूण १८ अक्षौहिणी सैन्य मारले गेले व फार मोठा मनुष्य संहार व अगणित साहित्याचा विनाश झाला. १८ अक्षौहिणी म्हणजे किती हत्ती, अंबाऱ्या, रथ, घोडे व योद्धे यांचा विनाश झाला ते खाली दिलेल्या कोष्टकावरून लक्षात येईल.

सैन्याच्या विभागांना चढत्या क्रमाने असलेली त्याकाळांतील नावे. १ पत्ती म्हणजे १ हत्ती, १ अंबारी, १ योद्धा व १ माहूत.
+ १ रथ, २ घोडे, १ रथीयोद्धा व १ सारथी
+ ३ अश्वारोही म्हणजे ३ अश्व व ३ योद्धे
+ ५ पद्मति (पायदळ सैनिक)

३ पत्ती म्हणजे १ सेनामुख
३ सेनामुख म्हणजे १ गुष्म
३ गुग्म म्हणजे १ गण
३ गण म्हणजे १ वाहिनी
३ वाहिनी म्हणजे पृत्तना
३ पृत्तना म्हणजे १ चमू
३ चमू म्हणजे १ आनिकिनी
१० आनिकिनी म्हणजे १ अक्षौहिणी.

या हिशेबाने १८ अक्षौहिणी म्हणजे अंबाऱ्या ३,९३, ६६०, हत्ती ३,९३, ६६०, रथ ३, ९३, ६६०, घोडे ३,९३, ६६०, १९, ६८, ३०० व योद्धे ४७, २३, ९२० अशा संख्या येतात.

प्रत्यक्ष रणांगणांवर असलेल्यांची ही आकडेवारी आहे. यानंतर यामध्ये न मोजलेली पण ज्यांचा नक्की नाश झाला अशी माणसे व साहित्य यांचा विचार करावा लागेल.

१) सर्व योद्धे व प्राणी यांच्या भोजनाची व्यवस्था पहाणारे - किमान ५ लाख
२) जखमी योद्धे व प्राणी यांची देखभाल करणारे - किमान २ लाख
३) अंबाऱ्या व रथ दुरुस्ती करणारे - किमान २ लाख
४) ४७ लाख योध्यांना आवश्यक असणारे शस्त्रे बनवणारे, त्यांच्यापर्यंत पोचवणारे व शस्त्रागार सांभाळणारे - किमान ५-६ लाख
५) गजारुढ व रथारूढ योध्यांना युद्ध सज्ज करणारे प्रत्येकी किमान १ सहाय्यक - किमान ८ लाख
६) महत्त्वाचे निरोप पोचवणारे, राजे लोकांचे नोकर, शत्रूंच्या गोटांत जाऊन बातम्या काढणारे ह्व अंदाजे ५ लाख
७) युद्धांत जायबंदी झालेल्या प्राण्यांच्या बदली हत्ती घोडे पुरवणारे व सांभाळणारे - २ लाख
८) सैनिक व प्राणी यांना रोजची रसद पुरवणारे - २ लाख
९) सर्वत्र स्वच्छता करणारे, मनोरंजन करणारे व इतर बाजार बुणगे हे सुद्धा लाखातच असणार.

हे सर्व रणभूमीच्या सभोवती असणार. पण वेगवेगळ्या अस्त्रांचे स्फोटक व किरणोत्सर्गी परिणाम यांच्यामुळे या सर्वांचाही विनाश झाला आहे. असे सांगतात की कुरुक्षेत्र परिसरातील भूमी

त्या सर्व अस्त्रांच्या भीषण परिणामांमुळे आजही निकृष्ट अशीच आहे.

अशाप्रकारे प्रचंड युद्ध साहित्य, लाखो हत्ती, घोडे व वाहने ओढणारे इतर प्राणी, ४७ लाख योद्धे व जवळ जवळ तेवढेच त्यांना साहाय्य करणारे असे, म्हणजे सुमारे १ कोटी पुरुष या सर्वांचा या युद्धांत विनाश झाला आहे.

**वा. प. पटवर्धन**

●●●

| | गजारुढ | | | रथारूढ | | | अश्वारुढ | | पदाति |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गज | अंबाऱ्या | योद्धे + माहूत | रथ | अश्व | योद्धे +सारथी | घोडे | अश्वारोही | |
| १ पत्ती | १ | १ | २ | १ | २ | २ | ३ | ३ | ५ |
| ३ पत्ती | ३ | ३ | ६ | ३ | ६ | ६ | ९ | ९ | १५=१सेनाप्रमुख |
| ३ सेनामुख | ९ | ९ | १८ | ९ | १८ | १८ | २७ | २७ | ४५ =१ गुष्म |
| ३ गुष्म | २७ | २७ | ५४ | २७ | ५४ | ५४ | ८१ | ८१ | १३५=१ गण |
| ३ गण | ८१ | ८१ | १६२ | ८१ | १६२ | १६२ | २४३ | २४३ | ४०५=१ वाहिनी |
| ३ वाहिनी | २४३ | २४३ | ४८६ | २४३ | ४८६ | ४८६ | ७२९ | ७२९ | १२१५=१ पृत्तना |
| ३ पृत्तना | ७२९ | ७२९ | १४५८ | ७२९ | १४५८ | १४५८ | २१८७ | २१८७ | ३६४५=१ चमू |
| ३ चमू | २१८७ | २१८७ | ४३७४ | २१८७ | ४३७४ | ४३७४ | ६५६१ | ६५६१ | १०९३५=१आनिकिनी |
| १०आनिकिनी | २१८७० | २१७८० | ४३७४० | २१८७० | ४३७४० | ४३७४० | ६५६१० | ६५६१० | १०९३५०=१अक्षौहिणी |
| १८अक्षौहिणी | ३९३६६० | ३९३६६० | ७८७३२० | ३९३६६० | ७८७३२० | ७८७३२० | ११८०९८० | ११८०९८० | १९६८३०० |
| १८अक्षौहिणी म्हणजे एकूण हत्ती ३९३६६०<br>अंबाऱ्या ३९३६६०<br>रथ ३९३६६० | | | | एकूण घोडे ७८७३२०<br>+११८०९८०<br>१९६८३०० | | | एकूण योद्धे ७८७३२०<br>७८७३२०<br>११८०९८०<br>१९६८३००<br>४७२३९२० | | |

# तत्व विचार

श्री. शं. बा . मठ

(उहापोह)

ईशावास्यं इदं सर्वं यत् किंचित् जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुंजीया: मागृध: कस्यस्विद् धनम् ।

सर्व विश्वात ओत प्रोत भरलेली अशी अदृश्य, अचिंत्य, सनातन व अविनाशी वस्तु आहे. आणि ती आनंदमय व सर्व जगाला चेतना आणि प्रकाश देणारी आहे तिचे नांव ब्रह्म किंवा ईश्वर. ब्रह्म म्हणजेच आत्मस्वरूप, जीवाची मूळ स्थिती, मूळ स्वरूप. वेद आणि उपनिषदे जीवाला जो उपदेश करतात, ज्ञान देतात, त्याचे नाव अध्यात्म विद्या. असे जे अविनाशी आनंदमय आत्मस्वरुप त्याचे विषयी अज्ञान हेच सर्व जीवांच्या दु:खाचे व अनंत यातनांचे कारण होय.

वेद, श्रुति, शास्त्रे, आणि संतवाङमय यानी दु:ख निवृत्ती व अत्यंत सुख प्राप्तीची साधने आणि उपाय सांगून जीवाना सुखरुप करण्याचा प्रयत्न केला आहे.

अशी एक वस्तू आहे, निर्विकार, निराकार, अविनाशी, आनंदरूप, ह्या वस्तूलाच आत्मा, ब्रह्म, परमात्मा, ईश्वर वगैरे अनेक नावाने ओळखतात. वेद सांगतात, जीवा हेच तुझे मूळ रुप, तुझे उत्पत्तिस्थान आहे. हा ब्रह्माचा परमेश्वराचाच तू अंश आहेस. 'तत्त्वमसि' म्हणजे ते तू आहेस. ह्या आत्मस्वरुपाच्या ज्ञानालाच आत्मज्ञान किंवा ब्रह्मज्ञान म्हणतात. या ज्ञानापुढे जगातील इतर ज्ञाने तुच्छ असून ती सर्व अज्ञानातच गणली जातात.

जगात अनेक विषयांची शास्त्राची ज्ञाने आहेत. पण आत्मज्ञान नसल्यामुळे सर्व जग दु:खी अतृप्त, असंतुष्ट आहे. आत्मज्ञान नसेल तर कितीही शिकलेला मनुष्य, किंवा महान संशोधक हा तात्विक दृष्ट्या कमीच पडतो.

मी कोण याचेच ज्ञान नसल्याने इतर सर्व ज्ञाने अज्ञानातच गणली जातात. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान बाकी सगळे अज्ञान.

'यास्मिन् ज्ञाते सर्वं विज्ञातं भवति' म्हणजे जे जाणले असता सर्व ब्रह्मांड जाणले जाते. आणि जे जाणले नाही तो पर्यंत काहीच जाणले नाही असे होते. वेद त्या वस्तूचे – ब्रह्माचे – जीवाच्या मूळ रुपाचे ज्ञान करून देत आहेत. 'तत्वमसि' । सर्वं खलु इदं ब्रह्म ।

याच आत्मतत्वाची प्रथमत: दोन रूपे मानली जातात, स्थूल सूक्ष्म, सगुण निर्गुण, व्यक्त – अव्यक्त साकार निराकार, इत्यादि प्रकारे. त्याचे स्वरूप वर्णन केले जाते व वेगवेगळ्या पद्धतीने ज्ञान करून दिले जाते.

परंतु हजारो माणसातून एखाद्यालाच ईश्वर किंवा ब्रह्म म्हणजे काय ते जाणण्याची इच्छा होते. अशा इच्छा असणाऱ्या हजार जणात फक्त एखादाच त्या बद्दल प्रयत्न – साधना करू शकतो. साधना करणाऱ्यात एखादाच टिकतो. त्याला आत्मस्वरुपाचे ज्ञान प्राप्त होऊन ब्रह्मरूप होतो.

मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चित् यतति सिद्धये ।
यततां अपि सिद्धानां कश्चित् मां वेत्ति तत्वत: ।। गीता

याचे कारण परमेश्वरी मायेने सर्व जगातील प्राणी मात्र स्त्री – पुरुष झपाटलेले आहेत, म्हणून सारे जग आहार निद्रा भय मैथुन या विषय सेवनात गुंग निमग्न असून सर्वाना आत्मविस्मृति झाली आहे. चतुष्पाद आणि द्विपाद या मधील अंतर फक्त कपड्याचे, बाकी सर्व एकच.

या मायेच्या पगड्यामुळे सत्य, आनंदमय, शाश्वत आणि सुखरुप अशा स्थितीतून दु:ख दैन्य दारिद्य असंतोष जन्म मृत्यू इत्यादी दु:ख समुद्रात सतत डुंबत आहेत आणि तरीही आम्ही तर मजेत आहोत असे म्हणत आहेत. इतका भयंकर पगडा बसला आहे, मायेच्या जगावर. संपूर्ण विस्मृति व भ्रमिष्ट, विपरित दृष्टी जिच्यामुळे होते ती माया खरे ते खोटे व खोटे ते खरे दिसणे, जे पाप आहे ते पुण्य व पुण्य आहे ते पाप, दिसणे होय.

अधर्मं धर्म इति या मन्यते तमसाऽवृता ।
स्वर्वार्थान् विपरीतांश्च बुद्धि: सा पार्थ तामसी ।

आज सर्वत्र हीच स्थिती आपण पाहात आहोत. चोराची पूजा आणि सन्मान केला जातो. सज्जनांची निंदा व उपासमार. पूर्वी पाप करण्याची लाज वाटत होती आता पुण्य करण्याची लाज वाटत आहे. यालाच विपरीत बुद्धिभ्रम किंवा अज्ञान किंवा माया म्हणतात.

मायेचे तीन प्रकार – समाश्रिता, उपाश्रिता, अपाश्रिता.

पुरुष प्रकृति उपाश्रिता, समाश्रिता ही योग माया, तिसरी अपाश्रिता – फार घातकी, जीवाना जन्म मरणाच्या फेऱ्यात अडकवून ठेवणारी, बुद्धी भ्रष्ट करणारी, हिचा नाश केला पाहिजे हिच्या तावडीतून सुटल्यास सुबुद्धि व भगवत् प्राप्ती शक्य.

ही माया जीवाला देवाकडे जाऊ देत नाही. खावे, प्यावे, मजा करावी, अनेक भोग भोगावेत, उद्योग धंदा करावा, देवाकडे कशाला जातोस. तिथे उपाशी मरशील, जे जे भक्ति मार्गाला लागले होते ते भिकारीच झाले. त्यांचा छळ व निष्कारण हाल झाले, तुकाराम, जनाबाई, सखुबाई, कान्होपात्रा, मीराबाई, या सर्वांचा अनन्वित छळच झाला, हाल झाले, उपासमार आणि कष्ट झाले, काय उपयोग त्या देवाचा आणि भक्तीचा. ज्ञानेश्वराना पायात घालयला वहाण देखील नव्हती, पोळ्या भाजण्यासाठी तवा अगर मडके सुद्धा त्यांच्याजवळ नव्हते अन् कोणी दिलेही नाही.

या मायेपासून फारकत घेतल्या वाचून दुसरा उपाय नाही. भक्ती करु लागलो म्हणून दारिद्य आले असे म्हणता येणार नाही. या समजुती मुर्खपणाच्या वा भक्ती न करणारा सुखी मानणे हे आपले अज्ञान. भक्तीचे मुख्य फळ स्वात्मज्ञान तत् द्वारा मुक्ती. इतर सारी फले गौण.

**भक्ती म्हणजे तप नव्हे :**

तपामधे अहंकार, मत्सर द्वेष नष्ट होत नाहीत. ते हृदयात कायमच असतात. भक्तीत हे समूळ नष्ट होतात. अंत:करण निर्मळ होते. 'हे विश्वचि माझे घर' ही निर्वैर आणि भगवत्मय वृत्ति होते.

हिरण्यकश्यपूने तप केले – वैर द्वेष गेला नाही. ध्रुवाने तप केले – मांडीवरून उठ म्हटल्याचा राग गेला नाही. चांगदेवाने तप केले.

ताठाकमी झाला नाही. विश्वमित्राने तप केले – वसिष्ठा बद्दलचा वैरभाव गेला नाही. प्रल्हाद नारद आदीनी भक्ती केली – त्यांची निर्वैर वृत्ती होऊन सर्वत्र परमात्मभाव अनुभवते झाले.

परमात्मा भक्तीनेच भेटतो तपाने नव्हे शिवाय भक्तीने मायेचा नाश होतो. भक्तीची मुख्य तत्त्वे अनन्यता, सर्वस्व अर्पण, सतत नामस्मरण, सगुण निर्गुण भक्ती – सकाम निष्काम असे भेद आहेत. मात्र हे गौण आहेत.

मुक्तेस्तु कारणं शुद्धा भक्तिरेव गरीयसी।
स्वस्वरूपानु संधानं भक्तिरित्यभिधीयते।

द्वैत भक्तीत सर्व तंत्रे आणि पथ्ये सांभाळलीच पाहिजेत. तेथे सर्व एकच आहे हे चालणार नाही. गणपतीला दूर्वाच, शंकराला बेल, विष्णूला तुळस, मारुतीला शेंदूर, शंकराला पांढरे कमळच द्वैत भक्तीत अद्वैताचे तत्त्वज्ञान चालणार नाही.

**प्रेम व मोह :**

भक्ती प्रेम स्वरुप असल्यामुळे तिच्यात भीती नसते देव आपल्याला शासन करील, उगीच भानगड नको वगैरे भावनाच तेथे नसतात. लोक इतर देवा पेक्षा शनी देवाला मात्र बिनचुक जातात. ते प्रेमाने नव्हे भीतीने. भिऊन केलेली भक्ती – उपासना अत्यंत कनिष्ठ होय. नरसिंहाला भ्याले, एकही पुढे येईना. पण छोटासा प्रल्हाद बिलकूल न भीता नरसिंहा समोर आला. व त्याने दंडवत घातले. भगवंताने उचलून त्याला मांडीवर घेतले भक्ती प्रेमरूप असते आणि प्रेमात भीती नसते.

प्रेम म्हणजे इंग्रजी भाषेतील लव्ह नव्हे. गोपिकांचे भगवान श्रीकृष्णावर प्रेम होते. मीरेचे श्रीकृष्णावर प्रेम होते. मूर्ख आणि विषय लंपट माणसे श्रीकृष्ण – गोपिकाबद्दल अत्यंत गलिच्छ उद्‌गार काढतात. नारदमुनी भक्ती सूत्रात यथा 'व्रज गोपिकानाम्' त्यांच्या सारखे भक्त श्रेष्ठ. भक्ति मार्गाचे आद्य प्रवर्तक श्रेष्ठ ज्ञानी, प्रल्हाद, वाल्मिक यांची भक्ती कशी असावी? तर गोकुळातल्या गोपिका सारखी असे सांगत आहेत. कबीरानी गोपिकांच्या एका प्रेमाश्रूतून 'बह गये कोटि कबीर' म्हणून मान खाली घातली. बृहस्पतीचा शिष्य उद्धव याने गोपिकांची चरणधूळ मस्तकी घेतली. इतका गोपिकांचा दर्जा उच्च आहे.

समाजात आज ज्याला प्रेम म्हणतात ते प्रेमच नसते. ते शरीराचे व सौंदर्याचे फक्त – वासनात्मक आकर्षण असते. त्या वासनेला आणि आकर्षणालाच कामुक लोक प्रेम म्हणतात. पण ती फक्त भोगवासना असते.

प्रेमाचे खरे स्वरुप वेगळे आहे. प्रेम व मोह यांची स्वरुपे बाहेरुन सारखीच आहेत. पितळेची चमकदार अंगठी व सोन्याची अंगठी सारख्याच दिसतात पण त्यांचे मूळ सारखे नसते.

प्रेम आणि मोह यातील फरक ओळखता आले पाहिजे. दोन्हीतील फरक पडताळून पहावे म्हणजे कळेल. १) प्रेम अविनाशी, मोह नाशवंत २) प्रेम अंत:करणाचा धर्म मोह मनाचा धर्म ३) प्रेमात परम सुख सुखित्व, मोहात स्वसुख सुखित्व ४) प्रेम अंतरंगावर असते मोह बहिरंगावर ५) प्रेमात वासना नसते मोहात वासना असते ६) स्त्री पुरुषाचे परस्पर लैंगिक आकर्षण प्रेम नव्हे तो मोह असतो. त्यात कामेच्छा वासना असते.

इच्छा तृप्त होताच आकर्षणात्मक मोह नष्ट होतो. ७) प्रेमात त्याग आहे मोहात स्वार्थ आहे. स्वार्थवृत्ती ते प्रेम नव्हेच. शुद्ध प्रेमात कोणत्याही गोष्टीची स्वार्थ दृष्टी वा अपेक्षा नसते. प्रेम म्हटल्यावर स्त्री पुरुषाचे जोडणे किंवा स्त्री पुरुष डोळ्यासमोर कारण त्यात वासना दडलेली असते हे प्रेम नव्हे.

त्याग हेच प्रेमाचे स्वरुप आहे. सर्वस्वाचा त्याग स्वतःच्या शरीराचा प्राणाचा सुद्धा, ''दारा सुत प्राण । करावे भगवंतासी अर्पण । हे भागवत धर्मपूर्ण । मुख्यते भजन नावे । '' एकनाथ

मीरा बाईने भवंतासाठी ''लोकलाज, कुलकी मर्यादा । या मै एक न राखूंगी । मै तो गिरिधर आगे नाचूंगी'' प्रल्हादाने बाप सोडला, राज्य सोडले, स्वतःच्या देह कल्याणाने गुरुची आज्ञा प्रमाण मानून फांदीच्या टोकावर बसून उलटी फांदी तोडली. देह विहरीत फेकला. गुरुची छाटी गडावरुन वाऱ्याने उडाली ती झेलण्यासाठी गडावरून खाली उडी ठोकली. गोरक्षाने गुरु साठी डोळा काढून दिला. लोकमान्य टिळकानी देशासाठी सर्वस्वावर तिलांजली ठेविली. बाजी प्रभूने व तानाजीने स्वातंत्र्यासाठी प्राण अर्पिले. द्रौपदीने अंगावरची पैठणी चटकन फाडून कृष्णाला दिली.

प्रेम ही वस्तु जगात दुर्मिळ आहे. ते आज घरातही नाही व बाहेरही नाही. सर्व दिल्या घेतल्याचे सर्वत्र मतलब व स्वार्थ. निर्मळ प्रेम ही वस्तूच आता कोठे उरली नाही. कुणाची कोणी वाट पाहात नाही. कोणावाचून कुणाचे अडले नाही, भाषा नाही, प्रेम नाही, माया नाही डोळ्यातून प्रेमाश्रू येत नाहीत. सर्वत्र निष्प्रेम जीवन झाले आहे. ओलावा कुठेच सापडत नाही. वैराण वाळवंट. पशुपक्ष्यात प्रेम दिसून येते तेवढे ही प्रेम माणसात नाही.

त्याग हेच प्रेमाचे स्वरुप आहे. प्रेम हे अविनाशी, कधीही नष्ट न होणारे असे आहे. नाहीसे होणे कमी होणे ते प्रेम नव्हेच.

गोपिकांचे भगवान कृष्णावर प्रेम होते मोह नव्हता. भक्तीची सारी लक्षणे त्याच्यात आढळतात – यत् करोषियदश्नासि । मन्मना भव मद्‌भक्तो । अन्यन्या श्चिंतयंतो माम् । मचित्ता मद्‌गत प्राणाः । हे गोपिकातून तपासून घ्यावे.

भक्तीचे फळ सत् गुरू प्राप्ती, ज्ञान प्राप्ती हेच आहे बाकीची फळे गौण आहेत. गुरवो बहवः सन्ति शिष्य वित्ताप हारकाः? विरलाः गुरवः सन्ति शिष्य चित्ताप हारकः।

'' जे शिष्यापासून धन उकळतात ते गुरु नव्हेत, शिष्याच्या चित्तात बदल घडवून आणणारे गुरु विरळच.''

एक गोष्ट लक्षात ठेवावी जेथे बहिरंग खूप आहे तेथे अंतरंग काही नाही. जेथे अंतरंग आहे तेथे बहिरंग मुळीच नसतो. गुरु कृपेशिवाय आत्मज्योत प्रकाशित होत नाही.

**शक्तिपात :**

शक्तिपात म्हणजे स्वतःच्या आध्यात्मिक शक्तीचा उपयोग शिष्यावर करुन त्यास निःसंदेह करणे त्याची समाधि लावणे शक्तिपात चार प्रकारचे – शब्द शक्तिपात, दृष्टीशक्तिपात, स्पर्श शक्तिपात

व संकल्प शक्तिपात. मंत्रोपदेश म्हणजेच शब्द शक्तिपात मस्तकावर हात ठेवणे स्पर्श शक्तिपात. शिष्याकडे कृपा दृष्टीने पाहाणे दृष्टी शक्तिपात, दूरच्या शिष्याला संकल्याने करण्यात येणारा संस्कार म्हणजे संकल्प शक्तिपात.

शंकराचार्यांनी त्रोटकावर संकल्प शक्तिपात केला. नरेंद्राच्या मस्तकावर श्रीरामकृष्णानी हात ठेवून त्याची समाधी लावली. हा स्पर्शशक्तिपात महात्मे स्पर्श टाळतात कारण दुष्ट पातकी लोकांच्या स्पर्शाचा साधकावर परिणाम होतो. महात्मे आपले पाय कुणाला धरु देत नाहीत. दुष्ट माणसाच्या नजरेत दुष्ट सामर्थ्य असते त्याला नजर लागणे म्हणतात. मात्र चित्तशुद्धी किंवा शिष्याची पूर्व तयारी असल्या शिवाय कोणाचाही गुरु कार्य करु शकत नाही. म्हणूनच ''उद्धरेत् आत्मानात्मानं'' असे म्हटले आहे. आत्मज्ञान गुरु करून देतात तो चित्तात ठसविण्यासाठी. चित्ताची शुद्धता लागते. त्यासाठी अनेक साधने आहेत – भजन, पूजन, उपवास, व्रते, जप, तप, वाचन, मनन, उपासना हे सर्व करण्याचे काम साधकाचे, गुरुचे नव्हे.

भगवत् कृपेने मनुष्याची वृत्ती अंतर्मुख झाली, तीव्र जिज्ञासा, इंद्रिय निग्रह, तीव्र वैराग्य, मुमुक्षत्व इत्यादी संपन्न झाला म्हणजे आत्मज्ञानाची ज्योत पेटवण्याचे काम फक्त शिल्लक राहते ते सद्गुरु करतात. 'विश्वासो गुरु वाक्येषु' हा दंडकच आहे. प्रत्येक गोष्टीची साधने दोन प्रकारची एक अंतरंग दुसरे बहिरंग अंतरंग जवळच्या रस्ता किंवा साधन, बहिरंग दूरचा रस्ता किंवा साधन साध्य आत्मतत्व ईश्वरप्राप्ती अखेरचे ध्येय.

कैवल्य प्राप्तीची साक्षात् साधन परंपरा –

एकूण सात पायऱ्या, हा मोक्ष स्थितीचा जिना दु:खापासून कैवल्यापर्यंतचा मार्ग –

१) दु:ख प्राप्ती – सांसारिक वासना, मोह, षड्रिपु, अज्ञान

२) सकाम कर्म साधन – नित्य दु:ख प्राप्ती

३) निष्काम कर्म अहंकार व फळाशा रहित होणारे कर्म

४) तीव्र वैराग्य – निष्काम कर्माचा परिणाम

५) चित्तशुद्धी – तीव्र वैराग्यामुळे

६) स्वात्मज्ञानाचे साधन – चित्तशुद्धी

७) कैवल्याचे साधन – स्वात्मज्ञान. प्रापंचिक जीवाची भक्ती, उपासना, सकाम कर्मातच गणली जाते.

जो पृथ्वीवर जन्माला आला त्याला दु:ख हे भोगलेच पाहिजे. हा मृत्यु लोकाचा कायदा आहे. इथल्या कायद्याप्रमाणे प्रत्येकाला वागलेच पाहिजे.

श्री ज्ञानेश्वराना खडतर जीवनाशी सामना करावा लागला. श्री रामकृष्ण परनहंस याना कॅन्सर झाला. स्वामी विवेकानंदाच्या घरी अठरा विश्वे दारिद्र्य होते. श्री प्रभूरामाना राज्यभिषेक व्हावयाचा त्याच दिवशी वनवासास सुरुवात झाली. पांडवाना वनवास स्वीकारावा लागला. तात्पर्य मृत्यू लोकात येणाऱ्या प्रत्येकाला मग तो संसारी, संन्यासी, देव कोणीही असो त्याला इथल्या कायद्याप्रमाणे

दु:ख हे भोगलेच पाहिजे दु:ख प्राप्तीनंतर सकाम कर्म ही दुसरी पायरी – ही भक्ती नव्हेच. या क्रिया पीडा परिहारार्थ मनुष्य करत असतो. म्हणजे याच्यात व्यापारी देवाण घेवाण आहे. निष्काम कर्म फलासक्ती सोडून कर्म. मग वयोपरत्वे वैराग्य अंगी बाणते व चित्तशुद्धीचा उदय होऊ लागतो. सर्व पापाच्या मुळाशी लोभ आहे.

कुणीतरी कोणाचीतरी उदाहरणे आणि मतलबा पूरती शास्त्र वचने घेऊ नयेत. वासना निवृत्तीसाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत. फसण्यात वा इतराना फसविण्यात काही अर्थ नाही.

विषय त्याग व वासनांची नि:शेष निवृत्ती झाल्या शिवाय चित्तशुद्धी कधीच होत नाही. व कोणत्याही इतर साधनांच्या आत्मज्ञाना प्रीत्यर्थ उपयोग होणार नाही. हा सिद्धान्त आहे.

यावत् बुद्धि विकारोऽस्ति यावत् चित्तं स्थिरं नहि।
आत्मतत्त्वं न जानाति तावत् मोक्षो न विद्यते ।।

चित्तात कोठलाही विकार अजिबात न राहणे याचे नांव चित्तशुद्धि. विश्वामित्राच्या मनात द्वेष मत्सर होता तो पर्यंत वसिष्ठानी त्याना कधीही ब्रह्मर्षी म्हटले नाही. या बद्दल त्याना संताप होई. ज्या वेळी पश्चात्ताप होऊन द्वेष मनातून नाहीसा झाला, तेव्हा वसिष्ठ विश्वमित्राना ब्रह्मर्षि म्हणून हाक मारली. व प्रेमाने अलिंगन दिले. अशुद्धपणा उत्कर्षाला प्रतिबंध करतो.

जीवाना जन्ममरण चक्रात पाडायला चित्तातल्या वासनाच कारण असतात. वासनेच्या पोटी जन्म घ्यावा लागतो हे त्रिवार सत्यआहे. यावत् जीवं त्रयो वंद्या: वेदान्तोगुरु: ईश्वर।

**आत्मानंद :**

वास्तविक विश्वात, ब्रह्माण्डात, संसारात, सर्व ठिकाणी आनंद अनुभवाला येतो. तो आत्मानंदच आहे. कारण आनंद ही वस्तु ब्रह्म किंवा आत्मस्वरुपाशिवाय दुसरीकडे मुळातच नाही. आणि सर्व जीव ज्या ज्या ठिकाणी आनंदाचा अनुभव प्रत्यही घेतात तो आत्मानंदच असतो. परंतु यथार्थ ज्ञान नसल्याने हा सर्व आनंद भौतिक द्रव्यातूनच मिळत आहे. असा भ्रम झालेला आहे. प्रतिक्षणि प्रत्येकाला आत्मानंदाचा अनुभव जरी आला तरी हाच तो आत्मानंद हे कळत नाही.

अयथार्थ ज्ञानाचा काही उपयोग नाही. अयथार्थ ज्ञान म्हणजे भ्रम, परोक्ष म्हणजे शाद्बिक किंवा ऐकीव ज्ञान, अपरोक्ष म्हणजे अनुभविक ज्ञान. ब्रह्माचे ज्ञान सर्वाना आहे. पण ते अयथार्थ आहे. वेद वाक्याप्रमाणे ''सर्वं खलु इदं ब्रह्म.'' बीजची झाले तरू। भांगारचि अलंकारु। तैसा मज एकाचा विस्तारू। ते हे जग। हे यथार्थज्ञान.

जे आपुलेनि भेदे विण। माझे जाणिजे एकपण। तयाचे नांव शरण। मज येणे गा। म्हणोनि मी होऊनि माते। सेवणे आहे आईते। तैसे करी हाता येते। ज्ञाने येणे। ज्ञानेश्वरी.

अन्यपण संपल्यावर ''चराचर आपणचि जाहला।'' खरे पाहता बद्ध कोणी नाही. व मुक्तही कोणी नाही. कारण बंधच खरा नाही.

बद्धो मुक्तो इति व्याख्या गुणतो मे न वस्तुत:।
गुणस्य माया मूलत्वात् न मे मोक्षो न बंधनम्।

ही भ्रमात्मक कल्पना अज्ञान मूलक आत्मविस्तृत झालेल्या जीवाची आहे आणि तो भ्रम दूर करणे हेच शास्त्रकाराचे सद्‌गुरूचे कार्य आहे. तेवढेच ते करतात.

अज्ञानेन आवृत ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तव: ।
न निरोधो न चोत्पत्पिर्न बद्धो न च साधक: ।
न मुमुक्षु: न वै मुक्त: इत्येषा परमार्थता ।

परब्रह्मच जगत् रूपाने, पंचमहाभूतरूपाने व्यक्त झालेले दृक् गोचर होते आणि अव्यक्त स्वरुपात दृष्टीला अगोचर होते. इतकेच. उत्पत्तीही नाही आणि नाशही नाही. नाश होतो फक्त कल्पित रुपाचा आणि नामाचा.

वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ।
वाक् वैखरी शब्दझरी शास्त्र व्याख्यान कौशलम् ।
वैदूष्यं विदुषां तावत् भुक्तये न तु मुक्तये ।
गोप्य: कामात् भयात् कंस: द्वेषात् चैद्यादयोनृपा: ।
संबंधात् वृष्णय: स्नेहात् यूयं भक्त्या वयं विभो ।

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

●●●

## आपली शब्दसंपदा

१) गो म्हणजे गाय यापासून निरनिराळे शब्द तयार झाले. गव्य-गायी -पासून झालेले पञ्चगव्य - दूध, दही, तूप, मूत्र, शेण यांचे मिश्रण. क्षीरं दधि तया चाज्यं मूत्र गोमयमेव च पञ्चगव्यम् । गोपाल, गोस्थान, गोष्ठ, गोवर्ण म्हणजे गोवर हा रोग मुलास झाला असता गाईच्या रंगाप्रमाणे मुलाचे आंग होते म्हणून या रोगाला गोवरे असे नाव पडले. गोविट् म्हणजे गाईचे शेण. गोवरी गोजी - गाईची पाडी इत्यादी.

२) संस्कृत शब्दातील ट चा मराठीत ड होतो. उदा - घट-घडा, वट-वड तट-तड, मर्कट-माकड, सुघट - सुगड

३) चक् - दचकणे. चकित, चकणे-मनुष्य चकित झाला म्हणजे त्याला काही सुचेनासे होते. यावरून एखादा काही भूल पडून फसला म्हणजे तो त्या कामात चकला असे म्हणतात.

४) आचारी - आचार म्हणजे शुचिर्भूतपणा, तो ज्यास आहे तो आचारी, असा आचारी शब्दाचा अर्थ आहे. स्वयंपाकाच्या कामात फार स्वच्छपणा ठेवतात. म्हणून स्वयंपाक्यास आचारी असे नाव पडले.

५) दण्डवत् - संस्कृत मधल्या वत् प्रत्ययाचा अर्थ च्या सारखा असा आहे. काठी (दण्ड) जमिनीवर पडल्यावर पूर्ण आडवी पडते. नमस्कार करून नम्रता दर्शवावी हे अभिप्रेत आहे म्हणून दण्डवत शब्दाचा अर्थ नमस्कार झाला.

●●●

**न शोभते क्रियाहीनं मधुरं वचनं तथा।।**[२१६]

क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे.

सुभाषिताची पहिली ओळ – कुसुमं वर्णसम्पन्नं गन्धहीनं न शोभते। न शोभते...

ज्या प्रमाणे एखादे सुंदर रंगाचे फूल कितीही आकर्षक असले तरी त्याला सुवास नसला तर त्याचे काहीच महत्त्व वाटत नाही. त्याचप्रमाणे माणसाने बोलण्याप्रमाणे कृती केली नाही तर बोलणे व्यर्थच ठरते.

**न नित्यं लभते दु:ख न नित्यं लभते सुखम्।।**[२१७]

जिवनात सतत दु:खच असते किंवा सतत सुखच असते असे नाही.

सुभाषिताची पहिली ओळ – सुखस्यानन्तंर दु:ख, दुखस्यानन्तंर सुखं। न नित्यं ...

दुसरे एक सुभाषित सांगते – चक्रवत् परिवर्तन्ते दु:खानिच सुखानिच। इंग्रजी कवी म्हणतो Life is a mixture of laughters and tears.

**मानसं देवमन्दिरम्।।**[२१८]

पूर्ण सुभाषित – सदाचारेण सर्वेषां शुद्ध भवति मानसम्।

निर्मलां च विशुद्धं च मानसं देवमन्दिरम्।।

चांगल्या आवरणामुळे सगळ्याचे मन शुद्ध होते, निर्मळ आणि शुद्ध मन हे देवाचेच मंदिर आहे असा उदात्त विचार ह्या सुभाषितात आहे.

**उत्साहो वर्धते येन वाचनं हितकारम्।।**[२१९]

हल्ली खेड्यापाड्यातून 'वाचाल तर वाचाल' अशी म्हण प्रचलित झाली आहे. संपूर्ण सुभाषित – शीलं सद्गुणसंपत्ति: ज्ञानं विज्ञानमेव च।

उत्साहो वर्धते येन वाचनं हितकारकम्।।

उपरोक्त सांगितलेल्या म्हणीचे मूळ ह्या सुभाषितात आहे.

**आलस्येन गतं दीर्घं जीवितं नैव जीवितम्।।**[२२०]

आळसात दीर्घकाळ जगला तो जगलाच नव्हे.

दुसरी ओळ – क्षणमेकं सुयत्नेन, या जीवति स जीवति।

प्रयत्न करून काहीतरी विशेष करून जगला मग तो अल्पकाळ का असेना तोच खरे जीवन जगला.

**आत्मवाच्यं न जानीने, जानन्नपि न मुह्याति।।**[२२१]

दुसऱ्याच्या डोळ्यातले कुसळ दिसते पण स्वत:च्या डोळ्यातले मुसळ दिसत नाही.

परवाच्येषु निपुण: सर्वो, भवति सर्वदा। आत्मवाचां ...

प्रत्येक जण नेहमी दुसऱ्याचे दोष काढण्यात पटाईत असतो. आपला दोष माहीत असूनही त्याची तो पर्वा करीत नाही. कळत असूनही त्या संबंधी तो मुग्ध राहतो.

**नीचो वदति न कुरुते, न वदनिसुजन करोत्येव ।।** [२२२]

सामान्य माणसे नुसती बोलत राहतात पण सज्जन बोलत नाहीत कृती करून दाखवितात.

शरदि न वर्षति गर्जति, वर्षति करतात पाऊस देत नाहीत पण वर्षा ऋतुतील ढग आवाज करीत नाहीत पण पाऊस देतात.

निस्वन: मेघ – आवाज न करणारा ढग.

**विक्रीते करिणी किमङ्कुशे विवाद:?२२३**

महत्वाच्या गोष्टीचा निकाल लागल्यानंतर क्षुल्लक गोष्टीवर वाद घालण्यात काही अर्थ नसतो. एकदा हत्ती विकला की त्याचा अङ्कुश कोणी घ्यायचा हा वाद निरर्थक आहे.

सौमित्रिर्वदति बिभीषणाय लङ्कं ।
देहि त्वं भुवनपते विनैव कोशम् ।
एनस्मित् रघुपतिराह वाक्यमेतद्
विक्रीते कातिणि किमङ्कशे विवाद: ।।

सौमित्री म्हणजे लक्ष्मण. सुमित्रेचा मुलगा श्रीरामांना म्हणाला हे भुवनपती आपण बिभीषणाला लङ्केचे राज्य द्यावे पण लंकेचा खजिना मात्र देऊ नये. यावर श्रीराम म्हणाले –

एकदा हत्ती विकल्यावर अङ्कुयासाठी वाद कशाला?

**पङ्के निमग्ने करिणि भेको भवति मूर्धग: ।।**[२२४]

मनुष्य संकटात सापडला की त्याची कोणीही हेटाळणी करतो.

गते हि दुर्दशां लोके क्षुद्रोऽप्य हितमाचरेत ।

पङ्के निमग्ने करिणि ...

हत्ती चिखलात रुतला की बेडूक पण त्याच्या डोक्यावर उड्या मारतात.

**यमस्तु हस्ते प्राणान् वैद्य: प्राणान् धनानि च ।।**[२२५]

यम तर फक्त आपले प्राण घेतो पण वैद्य प्राण आणि धन दोन्ही घेतो.

पहिली ओळ – वैद्यराज नमस्तुभ्यं वन यमराज सहोदर यमस्तु हरते. . .

हे वैद्या तुला नमस्कार तू यमाचा भाऊ आहेस . . .

क्रमश:

**श्री. दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३ विठ्ठल मंदिराजवळ,
मु. पो. मुद्रेखुर्द, ता. कर्जत
जि. रायगड ४१० २०१.
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

## पुनर्जन्म प्रमेय आणि प्रमाण (उत्तरार्ध)

कै. ह. ज.दामले

(कै. ह. ज.दामले. यांचा १९९६ साली प्रसिद्ध झालेला हा लेख आहे .पूर्वार्ध जुलै १२ च्या अंकात छापलेला आहे .)

'ब्रह्म' नादरुपाने - वेदांच्या रुपाने अभिव्यक्त होते आणि तो नाद अक्षरांच्या रुपाने साकार होतो. अमूर्तनाद अक्षरांच्या रुपाने साकार होतो म्हणून अक्षरे या नादाच्या 'मूर्ती' आहेत. जगातल्या सर्व भाषांचे मूळ असलेले शब्द हे अमूर्तनादाच्या मूर्तीच आहेत. संस्कृत भाषेच्या व्याकरणाची मूलभूत चौदा सूत्रे भगवान शंकराने वाजविलेल्या डमरुच्या अमूर्त नादाच्या अक्षररुप मूर्तीच होत्या. लिपिबद्ध झालेल्या 'टेन कमान्डमेन्ड्स' आकाशातील बापाच्या अमूर्त नादाच्या मूर्तीच आहेत.

सामान्य मनुष्य आपल्या स्वार्थाकरिता, हिताकरिता सर्व व्यवहार करीत असतो. विश्वाशी एकरुप झालेल्या महान तपस्वी ऋषी-महर्षींच्या तोंडातून आविष्कृत झालेले नाद त्यांच्या म्हणजेच विश्वाच्या, प्राणिमात्रांच्या हिताकरिताच असतात. त्यांचे तपोमय जीवन प्राणिमात्रांच्या कल्याणाकरिताच असते. म्हणून वेदांचे द्रष्टे (कर्ते नव्हेत) ते महर्षी सर्व विश्वाचेच आप्त आहेत. म्हणून त्यांचा शब्द (शब्दरुपाने साकार झालेला नाद-कसलाही वैयक्तिक स्वार्थ नसलेला अनाहत नाद) प्रमाण मानला जातो. मानला पाहिजे.

'यस्य निःश्वसितं वेदाः' असे शास्त्रकारांनी वर्णिले आहे. ब्रह्माशी तादात्म्य पावलेल्या त्या ऋषींचे, श्वासोच्छ्वासाप्रमाणे सहजतया मुखातून प्रकट झालेले ते शब्द म्हणजेच वेद. अमूर्त, बाह्य ज्ञानेंद्रिये ज्याचे आकलन करु शकत नाहीत अशा प्रमेयांविषयी वेद (शब्द) हेच प्रमाण मानले पाहिजेत.

वेदांमध्ये अवतारवर्णने आहेत. अग्नी, वरुण, मरुत, ब्रह्मा, विष्णू इत्यादी देवतांची वर्णने आहेत. ते अमूर्त परब्रह्म-विश्वव्यापिनी चिच्छक्ति अग्नी-वरुण इत्यादी रुपांनी अवतीर्ण झाली असे म्हटले आहे. त्याचा अर्थच ब्रह्माचा अग्निरुपाने जन्म झाला.

'एकोऽहं बहु स्थाम् प्रजायेय' (मी एक अनेक रुपांनी जन्माला येईन) हे श्रुतिवाक्य पुनर्जन्माचेच स्पष्ट सूचक आहे. जो ब्रह्मनिष्ठ होतो-ब्रह्मरुप होतो त्याविषयी 'न स पुनरावर्तते, न स पुनरावर्तते' - त्याला पुनर्जन्म प्राप्त होत नाही - द्विरुक्तिपूर्वक निर्धाराने सांगितले आहे.

ब्रह्मनिष्ठांना पुनर्जन्म नाही याचा अर्थ सामान्य माणसांना पुनर्जन्म असतो हे स्पष्ट होते.

श्रुतीचा, वेदाचा गहनगंभीर अर्थ सुलभ आणि स्पष्टपणे सांगणाऱ्या सर्व उपनिषदांचे 'सार' म्हणून सर्वमान्य जगप्रसिद्ध श्रीमद्भगवद्गीतेत तर पुनर्जन्माचा उल्लेख अनेकवार आला आहे.

१) हतोवा प्राप्स्यसि स्वर्गम् ।

युद्धात मरण पावलास तर स्वर्गात सुखरुप देवरुपाने जन्माला येशील

२) अनेक जन्मसंसिद्ध : नरःयाति परांगतिम् ।

अनेक जन्म तपस्या केल्यानंतर ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्यानंतर सद्‌गती मिळते 'न स पुनरावर्तते' ही अवस्था प्राप्त होते.

३) बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव च अर्जुन।

हे अर्जुना भूतकाळात माझी अनेक जन्मांतरे झाली. तुझीही झाली आहेत. भिन्न भिन्न समयी भिन्न भिन्न रुपाने माझे व तुझे अनेक पुनर्जन्म झाले आहेत.

४) जातस्य हि ध्रुवो मृत्युः । ध्रुवं जन्म मृतस्य च ।

जन्माला आलेल्या प्रत्येकाला मृत्यू अटळ आहे आणि मृताला पुन्हा जन्म (पुनर्जन्म) निश्चित आहे.

५) यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।

अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्।

अधर्म माजला, सज्जनांना जगणे कठीण झाले म्हणजे धर्माची संस्थापना करुन सुजनांना शांतपणे सरळ जीवन जगण्यासारखी परिस्थती निर्माण करण्याकरिता मी पुनः पुन्हा पृथ्वीवर जन्म घेतो.

या व अशा अनेक गीता-वचनांनी पुनर्जन्म ही कल्पना नव्हे तर वस्तुस्थिती आहे हे स्पष्ट होते. गीतेतील वरील शब्द हे पुनर्जन्माचे निश्चित प्रमाण आहे.

या संदर्भात लो. टिळकांचे नातू व 'केसरी' चे संपादक श्री. ग. वि. केतकर यांची एक आठवण हृद्य आहे. श्री. केतकरांनी उतारवयात वैचारिक साहचर्याकरिता एका युरोपियन वृद्ध विदुषी स्त्रीशी विवाह केला होता. (त्यामुळे त्यांना 'केसरी'चे संपादकत्व सोडावे लागले होते अशी त्यावेळी किंवदन्ती होती) ती दोघे एकदा एका उन्हाळ्यात महाबळेश्वराला राहत होती, तेव्हा एके दिवशी ती युरोपियन वृद्धा भरतकामाची एक चौकट तयार करीत होती. ते पाहून केतकरांनी तिला म्हटले, तू हे काय आणि कशाकरिता करीत आहेस? ती युरोपियन पत्नी त्यांना म्हणाली, ही भरतकामाची चौकट पूर्ण झाल्यावर त्यात मी मध्यभागी मला अत्यंत आवडलेला गीतेचा एक श्लोक विणणार आहे.

कोणता तो श्लोक असे कुतूहलाने विचारताच तिने उत्तर दिले, 'यदा यदा हि धर्मस्य गलानिर्भर्वात भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्.' हे उत्तर ऐकताच गीतेचा गाढ अभ्यास केलेले केतकर म्हणाले, 'या श्लोकातील कोणता विशेष तुला जाणवला? आवडला?'

ती विदुषी उत्तरली, 'भगवान पुनःपुन्हा अवतार घेतो, पुनःपुन्हा जन्म घेतो, ही जगातील कोणत्याही धर्मात, धर्मग्रंथात नसलेली संकल्पना मला फार आवडली.' ते ऐकून केतकर अवाक् झाले. इतकी वर्षे मी गीता वाचतो, तिचे पाठ करतो; पण वरील श्लोकाचे महत्व माझ्या मनात आले नाही, ते युरोपीय विदुषी महिलेने मला दाखवून द्यावे, याबद्दल त्यांना विस्मय वाटला, आनंद झाला. किंचित खंतही वाटली.

ही घटना सत्य आहे. उद्‌बोधक आहे आणि पुनर्जन्म असल्याचा भरभक्कम शाब्दिक पुरावा आहे.

अप्रत्यक्षरीत्या प्रत्यक्ष अनुमान यांच्या साहाय्याने पुनर्जन्माच्या अस्तित्वाचे ज्ञान (प्रमाण) होते.

स्त्रीपुरुषांचे-पत्नीपतीचे रज आणि रेत फलित झाले म्हणजे गर्भ निर्माण होतो आणि तोच मुलीच्या वा मुलाच्या रुपाने प्रगत होतो. याचा अर्थ रज आणि रेत यांचा गर्भ हा पुनर्जन्मच आहे.

दंपत्यो : स्नेहसंश्रयात् । आनंदग्रंथिरूपोयं
अपत्यमिति पठ्यते । (कालिदास)

पतिपत्नीचा विशुद्ध स्नेहमूलक आनंद अपत्याच्या रुपाने जन्माला येतो हे कालिदासाचे वचन पुनर्जन्माच्या अस्तित्वाचेच काव्यमय शब्दप्रमाण आहे.

आपण अनुवंश परंपरागत गुणविशेष मानतो. (सिनेमाच्या भाषेत खानदान) विशुद्ध वैज्ञानिकसुद्धा अनुवंश मानतात. काही रोग आनुवंशिक आहेत ही वस्तुस्थिती मान्य करतात (ही वस्तुस्थिती नास्तिकही नाकारू शकत नाहीत.)

या संदर्भात एकांन्तिक विज्ञाननिष्ठ व काही प्रमाणात नास्तिक मानल्या गेलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या दोन पुतण्यांपैकी एकाला बजावून सांगितले होते की, राजकारणात पडू नकोस. राजकारण्यांचे (निःस्वार्थी त्यागी) संसार उद्ध्वस्त होतात. जीवन उद्ध्वस्त होते. तू उत्तम प्रपंच कर. मुलेबाळे होऊद्यात. सावरकर वंशाचा निर्वंश होईल असे काही कृत्य करु नकोस. हे उद्गार बोलके आहेत. अनुकरणीय आहेत.

प्रत्येक घराण्याचे काहीना काही गुणविशेष असतात. दोष, रोगही असतात. ते वंशपरंपरेने सतत प्रकट व प्रगत होत असतात. त्याला अनुवंश असे म्हणतात.

वार्धक्यामुळे निर्वीर्य निष्क्रिय अवस्थेत पडून राहिलेल्या सिंहाला एक डुक्कर आपल्या सुळ्यांनी भोसकीत होते. सूड उगवीत होते. वनराजाचा अपमान केल्याचा आनंद मिळवीत होते. तेव्हा तो आसन्नमरण सिंह म्हणाला :

गच्छ सूकर भद्रने बृहि सिंहो मयाजितः ।
पण्डिता एवजानन्ति सिंहसूकरयोर्बलम।।

'जा डुक्करा जा. तुझो कल्याण असो. जगात सर्वांना सांगत सूट की, सिंहाला मी जिंकले, ठार मारले. (पण लक्षात ठेव) पंडित, जाणकार लोकांना सिंह आणि डुक्कर यांच्या शक्तीची वास्तव माहिती आहे. तुझ्या कंठशोषाचा काहीही उपयोग होणार नाही.

असेच एक बोधक उदाहरणः

जंगलात चुकून एकाकी पडलेल्या कोल्ह्याच्या पिल्लाला एका सिंहीणीने आपल्या निवासस्थानी आणले. स्वदुग्धाने त्याचे आपल्या छाव्याबरोबरच वात्सल्याने संगोपन केले. ते पिल्लू मोठे झाले. सिंहांच्या छाव्यांबरोबर हिंडूफिरु लागले. एकदा त्या छाव्यांबरोबर जंगलात हिंडत असता एका विशालकाय हत्ती त्यांच्यासमोर उभा ठाकला. त्याबरोबर ते सिंहाचे छावे हुंकारत हत्तीवर हल्ला करण्याकरिता सरसावले. पण तो जातिवंत भित्रा कोल्हा मागील दोन पायांत शेपूट घालून धूम पळत सुटला. सिंहीणीच्या कुशीत विसावला.

सर्व वृत्तान्त समजल्यावर सिंहीण त्या कोल्ह्याच्या पिल्लाला म्हणाली,

अरे बाळा - शूरोऽसि कृताविद्योऽसि दर्शनीयोसि पुत्रक ।

परं यस्मिन् कुले त्वमुत्पन्नः गजस्तत्र न हन्यते ।।

अरे तू शूर आहेस, हुशार आहेस, देखणा आहेस, पण ज्या कुळात तू जन्माला आहेस, त्या कुळात हत्तीला मारण्याची परंपरा नाही. तेव्हा (माझ्या छाव्यांना तुझे कूळ कळण्यापूर्वी) तू येथून पळ काढ आणि आपल्या कळपात जाऊन सुखाने राहा.

वरील दोन्ही सुभाषितांवरुन शौर्यधैर्यवीर्यादी गुणांची आनुवंशिकता सिद्ध होते. वरील गुणांच्या आनुवंशिकतेला अपवाद आहेत. पण अपवाद म्हणजे नियम नव्हेत हे लक्षात ठेवले पाहिजे.)

अनुवंश हा पुनर्जन्माचाच पुरावा आहे. पुनर्जन्माशिवाय अनुवंश निर्माणच होणार नाही. टिकणार नाही.

पुनर्जन्म अथवा अनुवंश यात व्यक्तीच्या देहाचा-भौतिक शरीराचा पुनर्जन्म होत नसतो. व्यक्तिमत्वाचा पुनर्जन्म होत असतो. देहाची ठेवण, रंग, रुप, विशेषतः डोळ्याची तेजस्विता, बुद्धिमत्ता, बोलण्याची ढब, दातृत्व, शौर्य, औदार्य इत्यादी सद्‌गुणांचा अथवा भित्रेपणा, अनुदारता, कुटिलता इत्यादी दुर्गुणांचा अन्तर्भाव होत असतो. खासकरून चेहऱ्याचा आकार, नाकाची ठेवण इत्यादिकांचा अन्तर्भाव आहे अशा व्यक्तिमत्वाचा पुनर्जन्म अन्तर्भाव होत असतो.

मुलाच्या वा मुलीच्या चेहेऱ्यात मातेच्या वा पित्याच्या चेहेऱ्याचे बरेचसे साम्य आढळते. त्यावरुन पितृमुखी कन्या व मातृमुखी पुत्र भाग्यवान असतो असे म्हटले जाते.

काही घराण्यांत खापरपणजोबा, पणजोबा, आजोबा, पिता व पुत्र अशाक्रमाने शरीरावर काही विशिष्ट तुळशीपत्राच्या आकाराचा डाग वा अन्य खूण असते. त्यावरुन आजोबाच पुन्हा तानवाच्या रुपाने जन्मला असे म्हणतात व त्याला आजोबाचे नाव न ठेविता अन्य नाव ठेविले तर आजोबांचे नाव ठेवीपर्यंत तो किरकिर करीत राहतो, असा कित्येकांचा अनुभव आहे.

वासांसि जीर्णानि यथाविहाय
नवानि गृह्णानि नरोऽपराणि
यथा शरीरणिविहाय जीर्णानि
अन्यानि संयाति नवानि देही ।। भ.गी.

मनुष्य जुनी झालेली वस्त्रे टाकून नवी दुसरी वस्त्रे घेतो. (वस्त्रे बदलतो. तो स्वतः कायम स्थिर असतो.) त्याप्रमाणेच परमात्म्याचाच अंश असलेला जीवात्मा (देही-देहधारण करतो तो.) जीर्ण शरीरे सोडून मनासह अनंतात विलीन होतो आणि कालान्तराने नवीन शरीरात मनासह प्रवेश करतो. जीवात्म्याने मनासह दुसऱ्या नवीन देहात प्रवेश करणे म्हणजेच पुनर्जन्म.

आत्मा निर्गुण-निर्लेप असल्यामुळे कितीही पुनर्जन्म झाले तरी त्यांच्यावर कोणतेच बरे वा वाईट संस्कार होत नाहीत. पण संवेदनशील आणि चेतन असल्यामुळे त्याच्यावर प्रत्येक पुनर्जन्मात संस्कार होत असतात. जन्मोजन्मीचे संस्कार

घेऊनच मन आत्म्यासह–जीवात्म्यासह पुनःपुन्हा जन्माला येत असते.

मन अनेक जन्मसंसिद्ध असते. जन्मजन्मांतरीच्या संस्कारांची प्रक्रिया वास्तव असल्यामुळेच शंकराचार्य, ज्ञानेश्वर, गुलाबरावमहाराज, रामानुजम (प्रसिद्ध गणिती) यांच्या बालपणीच प्रकट होणाऱ्या अलौकिक बुद्धिमत्तेची–प्रतिभेची उपपत्ती लागते.

ज्ञानेश्वरी हा अनेक जन्मांतील संस्कारांचा आविष्कार आहे. परिपाक, परिणती आहे. हे मान्य केल्याशिवाय अत्यल्प वयात एवढ्या परिणत प्रज्ञेने–प्रतिभेने निर्माण केलेल्या वरील महाभागांच्या ग्रंथांची, त्यांनी प्रस्थापित केलेल्या विचारपरंपरेची उपपत्तीच लागत नाही, लागणारही नाही. याचाच अर्थ असा, शांकरभाष्य, ज्ञानेश्वरी, जन्मतः अंध असलेल्या गुलाबराव महाराजांचे अनेक विषयांवरचे अलौकिक ग्रंथ पुनर्जन्माचे पुरावेच आहेत.

मागे बिहारमधील एक मुलगी आपल्या गतजन्मातील गाव, आईवडील इत्यादिकांच्या आठवणी सांगत असे. लोकांनी त्याच्या सत्यतेची ग्वाहीही दिली होती. म. गांधी त्या मुलीला भेटायला गेले होते. परंतु त्यांनी त्यावरुन पुनर्जन्माविषयी अस्तिपक्षी या नास्तिपक्षी खुलासा केला नव्हता असे स्मरते. येथवर ईश्वर परमात्मतत्व चिच्छक्ति परलोक आत्मा इत्यादी आहेत हे गृहीत धरुन विषयाची मांडणी केली आहे.

परंतु आता 'जीवनं' स्वर्गः 'मरणं' मोक्षः' ही अगदी वास्तववादी, बुद्धिवादी, भोगवादी, उपयुक्ततावादी, निव्वळ भौतिकवादी–जडवादी भूमिका स्वीकारली आणि पुनर्जन्म ही एक कल्पना, संकल्पना आहे, असे गृहीत धरले, पूर्णतया मान्य केले तरी 'पुनर्जन्म' ही एक केवळ संकल्पनाच सर्व प्राचीन भारतीय संस्कृतीची हजारो वर्षे अखंडपणे चालत आलेल्या भारतीय जीवनपद्धतीची जननी आहे हे मान्य करावेच लागते, लागेल.

का ते पाहा. काही व्यक्तीचे कुटुंब बनते. अनेक कुटुंबांचा समाज होतो. समाजातून ग्राम, नगर, राष्ट्र या अवस्था साकार होतात.

कुटुंबातील व्यक्ती जेव्हा परस्परांना सहाय्यक होतात तेव्हा कुटुंब एकजीव व स्थिर होते. ज्यांचा समाज बनला ती सर्व निदान बहुसंख्य कुटुंबे परस्परांना पूरक सहाय्यक होतील तेव्हाच त्या कुटुंबांपासून साकारलेला समाज एकजीव राहील. चिरस्थायी होईल.

कुटुंबाचे सर्व घटक सच्छिल आणि सर्वांचे हित ते आपले हित अशा जाणिवेचे असावेत. निदान कुटुंबप्रमुख तरी सर्वसंग्राहक–सर्वांचे हित जाणणारा व चारित्र्यसंपन्न असला पाहिजे. तो केवळ स्वहित, स्वाभिमान बाळगणारा नसला म्हणजे आपोआपच सर्व कुटुंब परस्परांशी आपलेपणाने वागू लागते. त्यामुळे संघर्ष होत नाही. संघर्ष हे विनाशाचे मूळ आहे. म्हणून कुटुंबात अंतर्गत व अन्य कुटुंबांशी, समाजाशी संघर्ष उत्पन्न होऊ नयेत. म्हणून व्यक्तीला, कुटुंबाला, कुटुंबाना (समाजाला) काही वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक बंधने पाळावी लागतात.

ही बंधने नैतिक व भौतिक अशी दोन प्रकारची असतात. नैतिक बंधनांमध्ये प्रामुख्याने मनाचा व गौणत्वाचे (पंचमहाभूतनिर्मित देहाचा) भौतिक देहाचा विचार असतो. भौतिक नियमात प्रामुख्याने भौतिकाचा-देहाचाच विचार केला जातो, मनाचा गौणत्वाने विचार असतो. या नियमांना आपण व्यवहारात कायदे असे म्हणतो.

भौतिक बंधनापेक्षा नैतिक बंधने श्रेष्ठ व जास्त परिणामकारक असतात.

या नैतिक बंधनांतही दोन प्रकार आहेत. निसर्गाची अपरिहार्यतेने पाळावी लागणारी बंधने, नियम, आचार व निसर्गाचा विचार करुन मानवाने निसर्गानुरुप जीवन जगण्याकरिता स्वतः होऊन आपल्यावर लादून घेतलेली बंधने.

भूक लागली असता जेवले पाहिजे हे नैसर्गिक बंधन, पण ते जेवण भक्षण कसे असावे, कशाचे असावे व कसे करावे यासंबंधी मानवाने काही बंधने स्वतःवर लादून घेतली आहेत.

बंधने नैतिक असोत वा भौतिक असोत, ती मोडणे नैतिक परिभाषेत पाप म्हणतात; तर भौतिक-व्यावहारिक परिभाषेत गुन्हा म्हणतात, पापासंबंधी प्राचीन धर्मशास्त्रकार सांगतात;

'मनसैवकृतं पापं न शरीरकृतं कृतम।'

मनाने जाणूनबुजून केले असेल ते पाप; शरीराने केलेले वा शरीराकडून घडलेले पाप हे खरे पाप नव्हे.

यावरुन पापाचा संबंध मनाशी असतो, तर गुन्ह्याचा संबंध शरीराशी असतो हे स्पष्ट होते. शारीरिक शिक्षेने व दंडाने मनुष्य गुन्ह्यातून मुक्त होतो. पण प्रायश्चित घेऊनही मन पापातून मुक्त होऊ शकत नाही. पापाचे शल्य मनाला अखंड बोचत राहते. कारण पापाची पुनर्जन्माशी सांगड बांधण्यात आली आहे. पापाचे फळ (कटू फळ) इहजन्मीच नव्हे तर पुनर्जन्मातही भोगावे लागते, अशी दृढकल्पना आज हजारो वर्षे भारतीयांच्या सर्व थरातील लोकांच्या मनात पक्की घर करुन बसली आहे. पुनर्जन्माच्या आधारावरच भारतीय नीतिअनीतीच्या कल्पना आधारलेल्या आहेत. इहजन्मी कोणाचे देणे मी बुडविले तर आता खालमानेने जगत आहेच. पण पुढील जन्मी बैल होऊन धनकोचे देणे फटके खात मला फेडावे लागेल ही जाणीव अगदी खेडवळांच्याही मनात पक्की बिंबलेली आहे.

देव, स्वर्ग, पाप, पुण्य, पुनर्जन्म या गोष्टी वास्तवात असोत वा नसोत, पण त्यांच्या आधारानेच आज हजारो वर्षे भारतीय संस्कृती अखंड प्रवाहित राहिली आहे, टिकून आहे.

संस्कृत भाषेत पत्नीवाचक शब्दांत 'जाया' शब्द आहे. त्याची व्युत्पत्तीः जायतेपतिः पुत्ररुपेण यस्यांसा जाया। (जिच्या ठिकाणी पती मुलाच्या व मुलीच्या रुपाने पुनर्जन्म घेतो ती जाया) अशी दिली आहे. मी चोर, दरोडेखोर असलो तरी माझा मुलगा चोर, दरोडेखोर नसावा; तो पांढरपेशा व्हावा, अशी चोराची प्रामाणिक इच्छा असते ही वस्तुस्थिती 'जाया' शब्दाच्या अर्थाने वास्तव ठरते.

'भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनकुत :- 'माझा देह जळून भस्म झाला की मी संपलो. माझे दुष्कृत संपले. लोकांचे देणे बुडाले. 'आप

मर गया दुनिया डूब गई' ही मनोवृत्ती जर सर्व समाजात बहावली तर सर्व समाजच नष्ट होईल.

आज भारत उभा आहे. सांस्कृतिक दृष्ट्या ताठ मानेने उभा आहे. त्याचे कारण पुनर्जन्म, रामकृष्ण पुनः पुन्हा अवतरले. पुनर्जन्म घेतला. वैकुंठवासी ज्ञानेश्वर-तुकाराम भारतात जन्मले. त्यांनी पुनर्जन्म घेतला म्हणून हे भारतवर्ष, ही भारतीय संस्कृती जिवंत आहे. थोडे का होईनात पण सत्प्रवृत्त लोक आजही विद्यमान आहेत, ते पुनर्जन्माच्या आधारेच आहेत हे विसरु नये.

संपूर्ण.

**कै. ह. ज.दामले**

•••

सद्धर्मचे एक देणगीदार व ''नक्षत्रांचे देणे''चे संपादक डॉ. सुनील गोंधळेकर, यांनी कृष्णमूर्ती पद्धत (फोर स्टेप थिअरी) वर एक दिवसीय तिसऱ्या ज्योतीष अधिवेशनाचे आयोजन रविवार दिनांक २८ ऑक्टोबर २०१२ रोजी सकाळी ९ ते संध्या. ६ या वेळांत मावळी मंडळ, गणेश टॉकीज जवळ, चरई, ठाणे येथे केले आहे. त्या अधिवेशनांस सद्धार्माच्या वाचकांस निमंत्रण दिले आहे. नोंदणी व अधिक माहितीसाठी, डॉ. सुनील गोंधळेकर, यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक ९८१९२४८१७९. त्यांचा पत्ता: १०९, गोदावरी, लक्ष्मी इंड. कॉम्प्लेक्स, टीजेएसबी बँके मागे, वर्तक नगर, ठाणे ४००६०१. वेळ सकाळी १०.३० ते संध्या. ६.३०.

•••

**(पृष्ठ क्र. ८ वरुन)**
लोकजीवनाचें नियमन करुं शकते.

धर्मशास्त्रार्थकुशलाः कुलीनाः सत्यवादिनः ।
समाः शत्रौच मित्रेच नृपतेःस्युः सभासदः ।।
श्रुत्यध्ययनसंपन्ना धर्मज्ञाः सत्यवादिनः ।
राज्ञा सभासदः कार्या रिपौ मित्रेच ये सभाः ।।

शार्ङ्गधर पद्धति (इ.स. पू. १३६३)

या श्लोकांत राजसभेचे सदस्य कसे असावे यांचे अगदीं स्पष्ट वर्णन केलें आहे. विद्वान, शब्दार्थनिष्णात, कुलीन, सत्यवक्ते आणि शत्रुत्वमित्रत्व विसरून तटस्थ वृत्तीनें घटनेचा विचार करणारे अशा सत्यान्वेषी सज्जनांनाच राजानें आपल्या 'सभेचे' सभासद म्हणून नेमावें असा, राजनीतीचा विचार करणाऱ्या दोन अडीच हजार वर्षापूर्वीच्या शास्त्रकारांनी स्पष्ट दण्डक घालून दिला आहे.

ज्यांच्या हाती सत्ता आहे, समाजाचें रक्षण, संवर्धन, संगोपन करण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे. ज्यांनीं लोकांना मार्गदर्शन करावयाचें आहे ते 'राजसभेचे सभासद' प्रामाणिक आणि शीलसंपन्न असलेच पाहिजेत. निर्लोभ, त्यागी, सत्प्रवृत्त आणि सात्त्विक मनःप्रवृत्तीचे असले पाहिजेत. तरच त्यांना समाजाला न्याय देण्याचं, मार्गदर्शन करण्याचं काम करतां येईल.

ग्रामसभेचे वा राजसभेचे सभासद जर ढोंगी, व्यसनी, अप्रामाणिक आणि मूर्ख असतील तर...तर काय? 'राष्ट्रं तदवसीदति.' तें राष्ट्र नष्ट होईल. दुसरं काय?

आतां प्रजा 'राजा' झाली आहे, तेंव्हा राष्ट्र नष्ट न होऊं देण्याची जबाबदारी प्रजेवर आहे. अधिक सांगणें न लगे.

## अध्याय ८ : अक्षर ब्रह्म योग

**अर्जुनाची शंका :**

ब्रह्म, अध्यात्म आणि कर्म। अधिभूत, अधिदैव यांचे मर्म।। अधियज्ञ जाणण्याचे वर्म। स्पष्ट करोनि सांगावे ।।

अधियज्ञ देहांत कैसा वसे। योग्यानी तुज जाणावे कैसे।। जेव्हा अंत समय येतसे। याचे करावे विवरण ।।१-२।।

**श्रीभगवंतांचे विवरण :**

अविनाशी परमात्मा ब्रह्म जाण। मूळ स्वभाव अध्यात्म्याची खूण।। भूत मात्रांचे जन्म मरण। तया कर्म म्हणावे ।।३।।

नाशवंत सृष्टी अधिभूत। अधिष्ठान चैतन्य अधिदैवत।। मीच सर्वश्रेष्ठ मानवांत। अधियज्ञ मानावा ।।४।।

अंतकाली जो मजला स्मरेल। स्मरूनि आपला देह सोडील।। माझ्या स्वरुपी येवून मिळेल। शंका नसे याविषयीं ।।५।।

मरणकाळी जैसे भाव असती। तैसी त्याला मिळते गती।। जे रूप असते सदा चित्ती। तेच आठवते ते वेळां ।।६।।

म्हणोनि मला सदैव स्मरोनि। मन बुद्धि मजला अर्पोनि।। लढशील जरी नि:शक होवोनि। अंती येशील मजकडे ।।७।।

सतत योगाभ्यास करून। चित्ताची एकाग्रता साधून।। करिता दिव्य पुरुषाचे चिंतन। त्याचीच प्राप्ती होत असे ।।८।।

सर्वज्ञ, अनादि, सृष्टीचा नियंता। अतिसूक्ष्म, सर्वांचा पालनकर्ता ।। अचिन्त्य, सूर्यासम तेजस्विता। अज्ञान तिमिर नाशी जो ।।९।।

त्याचे प्रयाणकाळी स्मरण करितां। स्थिरमनाने भक्तियोग आचरतां।। भ्रूमध्यें प्राणशक्ति एकवटतां। गती लाभे पुराण पुरुषी ।।१०।।

वैदिक ज्याला ॐकात म्हणती। विरक्त संन्यासी जेथें प्रवेशती। ब्रह्मचर्य ज्यासाठी आचरती। परम पद ते ऐक आतां ।।११।।

इंद्रियांचा निरोध करून। हृदयीं मनाला स्थिरावून।। प्राणाला मस्तकीं स्थापून। समाधि अवस्था साधावी ।।१२।।

समाधिमधें ॐकार चिंतन। करताना गेला देह सोडून।। तया परमगती जाते मिळून। ॐकार म्हणजे ब्रह्म असे ।।१३।।

अनन्य भावे सदोदित। माझेच स्मरण अंत:करणांत।। माझी प्राप्ती सुलभ होत। ऐशा कर्मयोगी पुरुषाला ।।१४।।

दु:खदायक अशाश्वत। पुनर्जन्म त्याना नाही मिळत।। जे येती माझ्यापर्यंत। उत्तम सिद्धी मिळवोनी ।।१५।।

ब्रह्मादि लोक कालबद्ध असती। तेथे जाणारे फिरून जन्मती।। माझ्यापर्यंत जे येती। त्याना पुनर्जन्म नसे ।।१६।।

हजार वेळां चारही युगें। ब्रह्मा एक दिवस भोगे।। तितकाच काळ रात्रीला लागे। कालज्ञ योगी

सांगती ।।१७।।

होतां ब्रह्म दिवसाची सुरवात। चराचर वस्तुमात्र दृष्य होत।। रात्र होतां विलीन पावत। अव्यक्त शरीरीं ब्रह्म्याच्या ।।१८।।

दिवस उगवतां उत्पन्न होणे। रात्र पडतां नाश पावणे।। सर्व भूतमात्र विवशपणे। आधीन असती मायेच्या।।१९।।

अन्य एक अव्यक्त सनातन। याहूनही असे महान।। भूतमात्र जाती नष्ट होऊन। तरीही त्याचा नाश नसे।।२०।।

तया अविनाशी अव्यक्त नाम असे। जेथून पुनरावृत्ती नसे।। परंधाम ते माझे असे। परम गतीही तीच।।२१।।

सकल चराचर ज्यांत राहे। ज्याने सर्व व्यापिले आहे।। तो पुरुषोत्तम साध्य आहे। अनन्य भक्तीने केवळ।।२२।।

कोणत्या मृत्यूने मोक्ष मिळे। पुनर्जन्म कोणत्या मृत्यूमुळें।। घडतसे ज्या काळवेळ बळें। त्याचे वर्णन ऐक आतां ।।२३।।

ज्वालाग्निसमक्ष, दिवसाचे वेळी। शुक्लपक्षी, उत्तरायण काळी।। योगी जातां मृत्यूजवळीं। परब्रह्मपदी पोचतो।।२४।।

धूम्राग्निसमक्ष, रात्रकाळांत। वद्य पक्षी, दक्षिणायनांत।। मरणारे जाती चंद्रलोकांत। पुण्य सरतां पुनरावृत्ती।।२५।।

ऐसे हे दोन मार्ग असती। देवयान, दुसरा पितृगती।। एकाने होई मोक्षप्राप्ती। दुसरा आणी पुनर्जन्मा।।२६।।

जे योगी हे मार्ग जाणती। त्यांचे मनी मोह न उरती।। म्हणोनि होण्या माझी प्राप्ती। रहा सदैव योगयुक्त।।२७।।

जो जाणी हे ज्ञान सकळ। तो मिळवी परमपद अढळ।। वेद, यज्ञ, तप, दान फळ। यांच्या पार जातो तो।।२८।।

ब्रह्म अध्यात्मादि विषयांवरी। सात प्रश्न अर्जुन विचारी।। भगवंत त्यांचे विवरण करी। समाधान करण्या अर्जुनाचे।।

विषय भक्तियोगाचा। दिवस केवढा ब्रह्मदेवाचा।। विचार निर्वाणयोग्य कालाचा। अक्षर ब्रह्मयोग समाप्त।।

**।।श्रीकृष्णार्पणमस्तु।।**

•••

## अध्याय ९

## राजविद्या राजगुह्य योग

श्रीभगवान पुढे सांगतात :

परम गोपनीय सरहस्य ज्ञान। ज्याने मुक्ती अशुभापासून।। गुणदर्शी तू आहेस म्हणून। आतां सांगतो, ऐक तू।।१।।

सर्वश्रेष्ठ विद्या, गुपित श्रेष्ठतम। सहज, सुबोध, पवित्र, उत्तम।। अविनाशी, धर्मसंमत, सुगम। स्वरुप असे या ज्ञानाचे।।२।।

या धर्माशी जे अश्रद्ध असती। ते जन्म मरण चक्रांत फिरती।। त्याना मजपाशी न मिळे गती।

हे सत्य अर्जुना ।।३ ।।

मी परमात्मा सच्चिदानंदघन। संपूर्ण जगताला आहे व्यापून ।। तरीही मी त्यामध्ये नसून । सकल चराचर माझ्या ठायी ।।४ ।।

माझा आत्मा भूते उपजवितो । धारण करूनही त्यांत नसतो ।। प्राणिमात्रही माझ्यांत नसतो । पाही माझे योग सामर्थ्य ।।५ ।।

संपूर्ण चराचर जगत । माझ्या ठायी असे स्थित ।। जैसा राही आकाशांत । वायू सर्व संचारी ।।६ ।।

कल्पान्ती सर्व सचेत अचेत । लय पावते माझ्या प्रकृतीत ।। दुसऱ्या कल्पाची होतां सुरवात । पुनश्च त्याना निर्मितो ।।७ ।।

माझ्या प्रकृतीची मदत घेऊन । भूतमात्र जे तिच्या आधीन ।। त्यांचे कर्मानुसार सृजन । वारंवार करितो मी ।।८ ।।

राहोनि निरासक्त, उदासीन । ही कर्मे मी करितो, म्हणून ।। मला त्या कर्मांपासून । कर्मबंध होत नसे ।।९ ।।

माझ्या आदेशाने प्रकृती । करिते सृष्टीची उत्पती ।। सृजन विनाश ही चक्रगती । चालू आहे अर्जुना ।।१० ।।

मानव देहधारी रुप पाहून । परमेश्वरी स्वरुप न जाणून ।। दुर्लक्षिती मजला जे जन । मूढ तयाना समजावे ।।११ ।।

वृथा आशा, कर्म, ज्ञान । यांच्या मोहाने अज्ञानी जन । वृत्तीने राक्षसी, आसुरी बनून । व्यर्थ घालविली सर्व काही ।।१२ ।।

परी सात्विक वृत्तीचे जन । माझे अव्यय स्वरुप जाणून ।। आणि सकलांचे उत्पत्तिस्थान । भजती मला निष्ठेने ।।१३ ।।

दृढनिश्चयी, प्रयत्नशील योगीजन । धारणा ध्यान गुण संकीर्तन ।। माझी उपासना, भक्ती करून । वंदिती अनन्य भावाने ।।१४ ।।

सर्व काही मलाच समजून । अथवा सेव्य सेवक भावांतून।। कोणी पूजिती ज्ञानसाधना करून । माझ्या विराट स्वरूपाला ।।१५ ।।

श्रौत स्मार्त यज्ञ मी । पितरांचे श्राद्धान्त, वनस्पतीही मी ।। मंत्र, तूप, अग्नि मी । हवन यज्ञांत केलेले ।।१६ ।।

जगाचा मायबाप, आजोबा मी । पवित्र ज्ञान, ॐकार मी ।। ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद मी । आधार सर्व जगाचा ।।१७ ।।

गति, पोषिंदा, स्वामी, पाहणारा । निधान, निवास, मित्र, आसरा ।। उत्पत्ती, स्थिती, लय करणारा । मीच बीज अविनाशी ।।१८ ।।

जगाला आवश्यक उष्णता देणे । पर्जन्याचे नियंत्रण करणे ।। जिवंत असणे अथवा मरणे । मीच सत्य असत्यही । ।१९ ।।

निष्पाप त्रिवेदी सोमयाजी । यज्ञाने पूजा करिती माझी ।। ते स्वर्गांत इंद्रलोकामाजी । दिव्य भोग भोगतात ।।२०।।

तिन्ही वेदांना आचरणारा योगी । पुण्याने विशाल स्वर्ग उपभोगी ।। पुण्य सरतां पुनर्जन्म या जगी । हेचि चाले वारंवार ।।२१ ।।

(पृष्ठ ३२ वर)

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

आट्टाहासापोटी असतो. मराठीतील अनेक 'प्रगतीशील' लेखकांनी चक्क पाश्चात्त्य लेखकांच्या कथा, कादंबऱ्या आणि नाटके यांची उचलेगिरी करुनही, त्याची नोंद आपल्या प्रस्तावनेत न करण्याचा अप्रामाणिकपणा राजरोसपणे केला आहे.यात आपण कोणाच्या अधिकारांचे व स्वातंत्र्याचे उल्लंखन करतो आहोत याचा त्यांना विसर पडतो. अशा 'सखाराम' आणि 'घाशीरामां'चे व्यक्त आणि अव्यक्त चौर्य जेव्हा एखादा समीक्षक उघड करतो, तेव्हा मात्र सर्व आळीमिळी गुपचिळी झालेली असते!

मध्यंतरी मराठीच्या 'स्वातंत्र्य'वीर लेखकांना कर्णाचा पुळका आला होता. कर्णावर झालेल्या अन्यायाने ते व्यथीत झाले होते. वास्तविक महाभारतातील व्यक्तिरेखा या महाभारतातील संदर्भांशीच अनुरूप असतात. त्यांना संदर्भहीन करणे, हा स्वातंत्र्यापेक्षा विकृतीचा भाग आहे. या सगळ्या महाभागांनी त्यांना अपेक्षित असणाऱ्या कर्णाची व्यक्तिरेखा साकारण्यासाठी नवीन महाभारत लिहायला काहीच हरकत नव्हती. पण तसे करायला क्षमता व जीवनातील अनुभव स्वीकारण्याची तरलता लागते. कल्पनेचे स्वातंत्र्य सर्वांनाच असते, पण 'कल्पना' जेव्हा वास्तव किंवा अभ्यास म्हणून सादर केली जाते, तेव्हा ती शुद्ध फसवणूक व अप्रामाणिकपणा असतो.

आपल्या धर्मातील 'कैवल्य', 'निर्वाण' किंवा 'मुक्ती' या संकल्पना, 'स्वातंत्र्य' कल्पनेच्याही खूप वर आहेत. घेण्यापेक्षा देण्यावर तेथे भर आहे. आत्मकेंद्रित होण्याऐवजी आत्मपरिक्षणाची तेथे तहान आहे. आणि सर्व 'अधिकार' त्यागाचा अंतिम टप्पा गाठण्याचा कायम प्रयत्न आहे. आजच्या 'स्वातंत्र्य' आणि 'अधिकार' यांचा घसा बसेस्तोवर आक्रोश करणाऱ्यांचा प्रवास मात्र याच्या अगदी उलट आहे.

'जबाबदारी' शिवाय 'अधिकार' अस्तित्वात असू शकत नाहीत.

दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या 'आदरा'शिवाय व्यक्तिस्वातंत्र्य टिकत नाही, आणि आपल्या 'लैंगीक' आणि व्यवहारिक 'स्वैराचाराचे' समर्थन करण्याकरता नीती अनीतीस दावणीस बांधता येत नाही, याचे तारतम्य सुटल्यामुळेच आपले स्वातंत्र्याचे, अधिकारांचे, नीती अनीतीचे सर्व वाद हे शुद्ध वकिली, तार्किक किंवा 'सोयिस्कर' संदर्भांना मिठी मारून होत असतात. समाजाचा सांस्कृतिक किंवा वैचारिक दर्जा त्यामुळे तीळमात्रही वाढत नाही.

व्यंगचित्रकारांच्या कल्पना बधिर होतील किंवा टीकाकारांना शब्दकोशामध्ये शब्द सापडणार नाहीत इतके किळसवाणे आणि ओंगळ स्वरुप आजच्या आपल्या लोकसभा, विधानसभा व पंचायतीतील कारभारात व्यक्त होतांना आपल्याला दिसतात. या स्वरूपांचे 'वास्तव' बघता, असीम त्रिवेदी यांचे व्यंगचित्र ठेंगणे वाटते. त्या चित्राचे वास्तव दर्शन व्यक्त करणारी प्रतिभा आज आपल्यात नाही आणि कदाचित कोणी तसे मांडले तर ते स्वीकारण्याची सहिष्णुताही आपल्यात शिल्लक नाही. हा प्रश्न स्वातंत्र्य किंवा अधिकाराचा नसून तो एका 'बधिर', 'सुस्त' आणि 'आत्मकेंद्रित' झालेल्या समाजाचा आहे.

आज हवे आहे ते हे 'वास्तव' स्वीकारण्याचे स्वातंत्र्य फक्त!

●●●

(पृष्ठ क्र. ३० वरून)

ईश्वर चिंतन अनन्य मनाने । सतत करी जो निष्काम भावाने ।। माझ्या ठायी स्थिर श्रद्धेने । त्याची काळजी मी घेतो ।।२२ ।।

जे श्रद्धावान भक्त असती । अन्य देवांची पूजा करिती ।। तेही माझीच पूजा करिती । विधिपूर्वक जरी नसे ।।२३ ।।

सर्व यज्ञांचा भोक्ता, स्वामी । परमात्मा तत्वतः असूनही मी ।। हे न जाणल्याने पुनर्जन्मी । यावे लागते तयाना ।।२४ ।।

देवभक्तांना देव लोक प्राप्ती । पितरपूजक पितृलोकी जाती ।। भूतपूजकांना भूतलोक मिळती । माझे भक्त माझ्याकडे ।।२५ ।।

निष्काम बुद्धीने, श्रद्धेने । जे देती समर्पण भावाने ।। ते मी स्वीकारतो, प्रेमाने । पत्र, पुष्प, फल, जल ।।२६ ।।

कर्तव्यचरण, आणि खाणे । हवन, दान, तप करणे ।। सर्व कर्मे मलाच अर्पिणे । ऐसे करावे, अर्जुना ।।२७।।

शुभाशुभ फलांचा त्याग करून । कर्मबंधांतून मुक्त होऊन ।। चित्त शुद्ध मुक्त होऊन । अंती येशील मजकडे ।।२८ ।।

प्रिय अप्रिय मज कोणी नाही । भूतमात्राना समान पाही ।। मद्भक्त परी मजपाशी राही । मीही भक्ताजवळ असे ।।२९ ।।

दुराचारी जरी वृत्तीबदलेल । बुद्धीने योग्य निश्चय करील ।। अनन्यभावाने मला पूजील । साधूच तया मानावा ।।३० ।।

तो सत्वर धार्मिक बनतो । शाश्वत शांती मिळवतो ।। माझ्या भक्ताला विनाश नसतो । निश्चित जाणावे अर्जुना ।।३१ ।।

स्त्री वैश्य शूद्रादिकही अर्जूना । कनिष्ठ कुळांत जन्म ज्यांना ।। मजला शरण येतील त्याना । गती मिळते उत्तम ।।३२ ।।

पुण्यवान ब्राह्मण राजर्षी भक्त । याना सद्गती मिळते निश्चत ।। जाणून अनित्य दुःखद जगत । सदैव माझे भजन करी ।।३३ ।।

मनी एकनिष्ठ भक्ती धरून । पूजन अर्चन नमन करून ।। आत्मैक्य भावें येता शरण । माझ्याकडे येशील तू ।।३४ ।।

सर्व चराचराची उत्पत्ती । करिते भगवंताची प्रकृती ।। ईश्वराची सर्वत्र अंशमात्रे वसती । त्याचे ठायी भूत मात्र ।।

ईश्वरोपासना करणे उत्तम । तीही असावी निष्काम ।। भगवंत वाही भक्तांना योगक्षेम । राजविद्या राजगुह्य योग समाप्त ।।

**।।श्रीकृष्णार्पणमस्तु ।।**

●●●

**संपादकीय :** डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक :** अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे – ४०० ६०१.
**मुद्रण स्थळ :** परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१.